संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०३८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६



## काटेवाडीची सून राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर पक्षाची आणि उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे सुनेत्रा पवार यांनी अत्यंत धीरोदात्तपणे समोर येऊन आपल्या ताब्यात घेतली. शनिवारी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांच्या तसेच आमदारांच्या समक्ष त्यांचा शपथविधी कार्यक्रम झाला. अत्यंत साधेपणाने शपथविधीचा कार्यक्रम पार पडला. सुनेत्रा पवार यांच्या रुपाने महाराष्ट्राला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मिळाल्या आहेत. शपथविधीच्या दोन तासांतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खातेवाटपही जाहीर केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनेत्रा पवार यांच्यावर क्रीडा, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्याक विकास या खात्यांची जबाबदारी सोपवली. अजित पवार यांच्याकडे असलेले वित्त आणि नियोजन खाते तूर्त सुनेत्रा पवार यांच्याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोपवले नाही. राष्ट्रवादीला अर्थखाते देण्यासाठी भाजपच्या वरिष्ठांचा हिरवा कंदील नव्हता.

# सुनेत्रा पवार पहिल्या महिला उपमुख्यमंत्री


**मुंबई (दै. संध्या)**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ नेतेपदी श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांची आज एकमताने निवड करण्यात आली. दरम्यान श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली असून महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ नेता निवडीसाठी आज विधानभवनात राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांच्या उपस्थितीत आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी दोन वाजता बैठक पार पडली.

या बैठकीत श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांची विधीमंडळ पक्षनेता म्हणून एकमताने निवड करण्यात आली तर विधीमंडळ पक्षनेता म्हणून व्हिप काढण्याचे तसेच विधीमंडळ कामकाज पार पाडण्यासाठी असलेले इतर सर्व संविधानिक अधिकार देण्यात येत असल्याचे दोन ठराव ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ यांनी मांडले तर दोन्ही ठरावाला मंत्री हसन मुश्रीफ, ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री धनंजय मुंडे, मंत्री नरहरी झिरवाळ, माजी मंत्री संजय बनसोडे यांनी अनुमोदन दिले.

या बैठकीला ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार नितीन पाटील, आमदार अनिल पाटील, आमदार मनोज कायंदे, आमदार सुलभा खोडके, आमदार राजू कारेमोरे, आमदार राजकुमार बडोले, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार चंद्रकांत नवघरे, आमदार राजेश विटेकर, आमदार नितीन पवार, आमदार माणिकराव कोकाटे, आमदार दिलीप बनकर, आमदार सरोज अहिरे, आमदार हिरामण खोसकर, आमदार सना मलिक, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार ज्ञानेश्वर कटके, आमदार शंकर मांडेकर, आमदार सुनील शेळके, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधानसभा मुख्य प्रतोद आमदार चेतन तुपे, आमदार किरण लहामटे, आमदार आशुतोष काळे, आमदार काशिनाथ दाते, आमदार संग्राम जगताप, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे, आमदार संजय बनसोडे, आमदार सचिन पाटील, आमदार शेखर निकम, विधानपरिषद मुख्य प्रतोद आमदार विक्रम काळे, आमदार सतिश चव्हाण, आमदार पंकज भुजबळ, आमदार अमोल मिटकरी, आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार इद्रीस नायकवडी, आमदार संजय खोडके आदींसह माजी मंत्री नवाब मलिक, माजी आमदार झिशान सिद्दीकी, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर,पक्षाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, अल्पसंख्याक नेते नजीब मुल्ला, पक्षाचे सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, प्रदेश सरचिटणीस संजय तटकरे,सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी उपस्थित होते.



## अजितपवारांचा लोकाभिमुख वारसा पुढे नेत महाराष्ट्राच्या सेवेसाठी कर्तव्य भावनेने सज्ज : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना मन अत्यंत भावुक झाले आहे. आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना 'शिव–शाहू–फुले–आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारत आहे. अजितपवारांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे. त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि लोकाभिमुखतेने काम करत राहीन, हा विश्वास मी आज या निमित्ताने देते. या कठीण काळात महाराष्ट्रातील जनतेने दिलेले प्रेम, विश्वास आणि पाठिंबा हेच माझे सर्वात मोठे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने आणि नव्या ऊर्जेने पुढे चालत राहीन. शेतकऱ्यांच्या हितासाठी, युवकांच्या संधींसाठी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या प्रत्येक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे हे माझे सर्वोच्च प्राधान्य असेल. देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी साहेबांच्या 'विकसित भारत २०४७ ' या संकल्पनेला बळ देण्यासाठी तसेच देशाचे गृह व सहकारमंत्री आदरणीय अमित शाह साहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यास राज्य शासन सदैव तत्पर राहील. तसेच, नव महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा वारसा समर्थपणे पुढे नेण्याची जबाबदारी आम्ही सर्वजण अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडू. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या साथीने महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी, सामाजिक समता, आर्थिक प्रगती आणि सर्वसमावेशक समृद्धी साधण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. जनतेच्या अपेक्षांना न्याय देणे, शासन-प्रशासन अधिक संवेदनशील व लोकाभिमुख बनवणे आणि राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणे, हाच माझा संकल्प आहे. पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेचे, सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सहकाऱ्यांनी माझ्यावर ठेवलेल्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करीन, हा शब्द देते.



"महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून कार्यकाळ सुरू करणाऱ्या सुनेत्रा पवारजी यांना शुभेच्छा. मला विश्वास आहे की त्या राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी अथक परिश्रम करतील आणि दिवंगत अजितदादा पवार यांचे स्वप्न पुढे नेतील."

**- श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, हा त्यांच्या पक्षाचा विषय आहे. पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या, हा चांगला विषय आहे. राजकीय डावपेच मी सांगू शकत नाही. त्यांनी आता सर्वांना सोबत घेऊन चालावं, आता गिधाड घिरट्या घालायला लागले आहेत, त्यांच्यावर आता लक्ष ठेवावे लागेल, अजितदादांसोबत न दिसणारे गिधाड आता दिसू लागले आहेत, सुनेत्रा पवार यांनी अचानक जमलेल्या या ढेकणांवर लक्ष ठेवावे, असा सल्ला यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांना दिला आहे. काही अडचणीमुळे सुनेत्रा पवार यांनी तातडीनं उपमुख्यमंत्रिपद स्विकारलं असावं, पार्थ आणि जय पवार यांना दादांनी काही सल्ला दिला असेल तर त्याचं त्यांनी पालन करावं.

**- श्री. मनोज जरांगे पाटील**



"महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या काही काळात पार विचका झाला आहे त्यावर खरंतर भाष्य पण करावं असं वाटत नाही. पण तरीही आज दिवसभर ज्या घडामोडी सुरु आहेत त्यावर बोलावंच लागेल." "राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासारख्या अस्सल मराठमोळ्या मातीतला, आणि रांगड्या पक्षाचा अध्यक्ष हा कोणीही मराठी असावा, पाटील असावा पण पटेल नाही." ?

**- श्री. राज ठाकरे**



अजित पवार यांची उणीव कोणत्याही परिस्थितीत भरून निघू शकत नाही. आमच्यासारखे अनेकजण आज दादांना खूप मिस करत होते. सुनेत्रा पवार यांनी अत्यंत जड अंतःकरणाने उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. सुनेत्रा वहिनींनी हे शिवधनुष्य उचलले आहे त्यांच्या या निर्णयाचे स्वागत.

**- श्री. अमोल मिटकरी**



"राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्राकाकींनी शपथ घेतली, याचा नक्कीच आनंद आहे. खरं सांगायचं तर अजितदादांची जागा जगात दुसरं कुणीच घेऊ शकत नाही. पण सुनेत्राकाकींच्या रूपात आम्ही किमान तिथं दादांना पाहू शकू, हाच एक आधार आहे. अशा परिस्थितीत त्यांना शुभेच्छा तरी कशा द्याव्यात, हेच समजत नाहीये."

**- श्री. रोहित पवार**

# सुनेत्रा पवार यांचा शपथविधीची माहिती नाही - शरद पवार

**बारामती (दै. संध्या)**



अजित पवार यांच्या अपघाती आकस्मिक निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाभोवती सुरू असलेल्या प्रश्न आणि अटकळांच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की परिस्थिती अशी आहे की अजित पवारांची जबाबदारी घेण्यासाठी कोणाला तरी पुढे यावे लागेल. मात्र सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी होणार आहे याबाबत मला काही माहिती नाही. त्यांचे नेते आहेत ते निर्णय घेऊ शकतात तो त्यांचा अधिकार आहे. प्रफुल पटेल सुनिल तटकरे हे नेते आहेत. या पवार यांच्या वक्तव्यामुळे भविष्यात राजकारण तापण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शरद पवार यांनी सकाळी बारामती येथीस गोविंदबाग या निवासस्थानी सकाळी पत्रकार परीषदेत घेतली. यावेळी त्यांनी सांगितले की सुनेत्रा पवार यांच्या महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीबाबत सध्या त्यांच्याकडे कोणतीही अधिकृत माहिती नाही. आपल्याशी कोणी चर्चा केली नाही सुनेत्रा यांच्याशी आपली चर्चा झाली नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांचा कोणताही निर्णय पक्षाच्या पातळीवर घेतला जाईल आणि अंतिम निर्णय पक्षच घेईल.

पक्षातील लोकशाही प्रक्रियेद्वारे भविष्यातील कार्यवाही निश्चित केली जाईल, असेही ते म्हणाले.

शरद पवार यांनी सांगितले की जयंत पाटील आणि अजित पवार गेल्या चार महिन्यांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा करत होते. या चर्चा सकारात्मक पद्धतीने पुढे जात होत्या आणि १२ तारखेला जाहीर घोषणा होणार होती. त्यांच्या मते, अजित पवार या प्रक्रियेबद्दल खूप गंभीर होते आणि त्यांना संघटना एकत्र करायची होती.

यावेळी अजित पवार यांची आठवण काढताना शरद पवार भावूक झाले. ते म्हणाले की, अजित पवार एक सक्षम, मेहनती आणि वचनबद्ध नेते होते जे नेहमीच सामान्य लोकांसाठी काम करत असत.त्यांना जनतेच्या समस्या सखोलपणे समजल्या आणि न्याय मिळवून देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. बारामतीचे लोक नेहमीच त्यांच्या पाठीशी उभे राहिले आणि त्यांनीही कधीही आपले कर्तव्य पार पाडण्यात कसूर केली नाही.

## कुटुंबातील नवीन पिढीकडून अपेक्षा

अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या राजकीय आणि भावनिक पोकळीबद्दल बोलताना शरद पवार म्हणाले की, आता ताकदीने पुढे जाण्याची वेळ आली आहे. आपण लोकांच्या दुःख आणि वेदना कमी करण्यासाठी काम केले पाहिजे आणि अजित पवार यांनी ज्या मूल्यांनी आणि कार्यनीतीने लोकांची सेवा केली तीच मूल्ये आणि कार्यनीती पुढे नेली पाहिजे. कुटुंबातील नवीन पिढी त्यांचा वारसा आणि कार्यनीती पुढे नेईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान शरद पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्या शपथविधी सोहळ्यात उपस्थित राहावं अशी विनंती करण्यासाठी अजित पवार यांचे पुत्र पार्थ सकाळीच गोविंदबागेत गेले होते सुमारे पावनेदोन तास त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहीत पवार तसेच युगेंद्र पवार उपस्थित होते. मात्र पार्थ यांच्या विनवनीला शरद पवार यांनी प्रतिसाद दिला नाही.

# संपादकीय

## पेटीत गोड, पेटाऱ्यात काय ?

तुम्हाला एकाचवेळी मॅरेथॉन आणि स्प्रिंट म्हणजे दीर्घ पल्ल्याची व छोटी शर्यत धावायची आहे, असे एक वेधक वाक्य यंदाच्या आर्थिक पाहणी अहवालात आहे. याचा अर्थ - अमेरिकेने लादलेले जाचक टॅरिफ, जगभरातील भू-राजकीय तणावाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम, रुपयाची घसरगुंडी या तत्कालिक प्रश्नांवर तोडगा काढायचा आहेच, शिवाय विकसित भारताचे स्वप्न, जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून आयात-निर्यात समतोल तसेच महागाईला आळा, जगातील सर्वाधिक लोकसंख्येच्या देशातील बेरोजगारीचे आव्हान, या दीर्घकाळाच्या समस्यांचेही निराकरण करायचे आहे. मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांच्या चमूने तयार केलेल्या आणि वित्तमंत्री निर्मला सीतारामण यांनी गुरुवारी संसदेत मांडलेल्या यंदाच्या आर्थिक पाहणी अहवालाचे प्रथमदर्शनी सार हेच आहे. या अहवालात एकूणच सकारात्मक चित्र रेखाटताना काही आव्हानेही अधोरेखित करण्यात आली आहेत. चालू आर्थिक वर्षात विकासदराची वाढ ७.४ टक्के राहील आणि येत्या वर्षात ती ६.८ टक्के ते ७.२ टक्के राहील. म्हणजे संकटकाळातही विकासाचा वेग कायम राहील. मजबूत देशांतर्गत मागणी, उत्पादन क्षेत्रातील सुधारणा आणि सेवा निर्यातीची लवचिकता ही आपल्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये आहेत. सोबतच अमेरिकेने लादलेले आयातशुल्क, भू-राजकीय तणाव आणि व्यापारातील अडथळे या आव्हानांचा विचार करता सावध राहण्याची गरज आहे. म्हणजे, सारे काही चांगलेच नसले तरी आपण आशावादी नक्की आहोत. आव्हानांना तोंड देण्यासाठी काही 'बफर्स' उपलब्ध आहेत. वित्तीय तूट नियंत्रणात आहे. ती सतत घटत आहे. 'मायक्रो इकॉनॉमी' हे भारतीय वैशिष्ट्य अजून टिकून आहे. युरोपीय महासंघाने दोनच दिवसांपूर्वी भारतासोबत व्यापारी महाकरार केला आहे. एकूण जागतिक परिस्थितीचा विचार करून अमेरिकादेखील व्यापार करारासाठी तयार आहे.

तथापि, रुपयाचे अवमूल्यन हे मोठे संकट आहे. गेल्या एप्रिलपासून अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपयाची तब्बल ६.५ टक्के घसरण झाली आहे. त्यामुळे एक मोठा वर्ग चिंतित आहे. सरकार हे मानायला तयार नाही. यामुळे निर्यातीला चालना मिळेल. निर्यात वाढली की व्यापारी तूट कमी होईल, स्वदेशीचा आग्रह धरला व निर्यातीत विविधता आली की परकीय चलन येईल, असा सरकारचा दावा आहे. केवळ रुपयाच्या अवमूल्यनावरून अर्थव्यवस्थेची स्थिती जोखण्याची घाई करू नका, अशी वित्तमंत्री व आर्थिक सल्लागारांची सूचना आहे. त्या सूचनेमुळे चलनव्यवहारातील असमतोल कमी होत नाही ही बाब अलहिदा. त्याचमुळे आर्थिक पाहणी अहवाल सादर झाल्यानंतर रुपया आणखी घसरला आणि त्याने आतापर्यंतची नीचांकी पातळी गाठली. या सगळ्या जागतिक घडामोडी व आर्थिक परिस्थितीच्या पलीकडे यंदाच्या अहवालातील एक मुद्दा मात्र देशांतर्गत व गंभीर आहे. बहुतेक सगळ्या राज्यांमध्ये मतदारांना थेट लाच म्हणून निवडणुकीपूर्वी रोख रकमा देण्याची एक नवी संस्कृती रूजली आहे. वरून हे केवळ निवडणुकीपुरते आहे असे मतदारांना वाटू नये म्हणून 'लाडकी बहीण' किंवा 'लाडली बहना' यांसारख्या योजनांच्या रूपाने दर महिन्याला ठराविक रक्कम देण्याची टूम चांगलीच बहरली आहे. बिहारच्या निवडणुकीपूर्वी तर जवळपाच ७५ लाख महिलांना लघुउद्योगासाठी मदत म्हणून प्रत्येकी दहा हजारांची खिरापत वाटण्यात आली. सोबतच ही रक्कम योग्यरीत्या वापरणाऱ्या महिलांना आणखी प्रत्येकी दोन लाखांचे आश्वासन देण्यात आले. त्या बळावर राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार पुन्हा सत्तेवर आले. आता बिहारची आर्थिक स्थिती चिंताजनक आहे. राज्याराज्यांमधील या रेवडीची किंमत येत्या वर्षात पावणेदोन लाख कोटी असेल. यामुळे संबंधित राज्यांच्या तिजोरीत ठणठणाट आहे. पायाभूत सुविधा, उद्योगांची उभारणी वगैरे उत्पादक बाबींवरील खर्च सोडा, कर्मचाऱ्यांच्या पगारासाठीही जुळवाजुळव करावी लागत आहे. हे प्रकार थांबविण्याची सूचना अहवालाने केली असली तरी 'इतरांची ती रेवडी आणि आमचे ते लोककल्याण' अशा प्रचारकी व सवंग लोकप्रियतेचे राजकारण त्या सूचनेचा किती आदर करील, हे साऱ्यांनाच माहिती आहे. आर्थिक पाहणी अहवाल हा दुसऱ्या दिवशी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाचा झरोका मानला जातो. यंदाच्या या झरोक्याने सावधगिरीची कडा असलेले अत्यंत रम्य चित्र रेखाटले आहे.

## गुरु वचन

### इतरांचेही दु:ख पहा

एकदा एका झाडाखाली सशांनी आपली एक तातडीची सभा बोलावली. सर्वच ससे दु:खी आणि घाबरलेले होते. एक ससा उभा राहून म्हणाला, ''मित्रहो, आपलं जीवन फारच दु:खी आहे आणि या दु:खातून आपली सुटका होणे कधीही शक्य नाही. आपल्याला मनुष्य, कुत्रा, गरूड आणि इतरही अनेक लहान मोठ्या प्राण्यांपासून धोका आहे. तेव्हा आपण सर्वचजण एखाद्या तलावात जाऊन जीवन देऊया.

जिवंतपणी या अनंत यातना भोगण्यापेक्षा मरण परवडले. शिवाय आपण एकत्र मरू. म्हणजे दुसऱ्याच्या मरणाचे दु:खही करायला नको.'' त्या सशाचे बोलणे सर्व सशांना पटले. त्या सर्वांनी एकाच वेळी प्राणत्याग करण्याचे ठरवले. प्राणत्याग करण्याचा दिवसही ठरविला गेला.

ठरलेल्या दिवशी सर्व ससे आपल्या कुटंबातील लहानथोरांसह एकत्र जमले. थोड्याच वेळात सशांचा एक मोठा समूह तळ्याकाठी आला. त्या तळ्याकाठच्या चिखलात बरेच लहानमोठे बेडूक खेळत होते. सशांना पाहून ते घाबरले आणि त्यांनी भराभर तळ्यात उड्या टाकल्या. ते पाहून एक हुशार ससा म्हणाला,

''मित्रांनो, थांबा. घाई करू नका. आता तुम्ही पाहिलंत ना. आपल्याला घाबरणारे प्राणीही या जगात आहेत. त्यांचं दु:ख आपल्यापेक्षाही मोठं आहे. तरीही ते हिंमत बाळगून जगताहेत ना मग आपण कशाला दु:खी आणि निराश व्हायचं! या प्राण्यांपेक्षा आपण सुखी आहोत.

तेव्हा आपल्यापेक्षा सुखी प्राण्यांकडे न पहाता दु:खी प्राण्यांकडे पाहून आपण जगायला हवे. म्हणजे आपले दु:ख आपल्याला जाणवणार नाही. तेव्हा चला आता आपआपल्या घरी आणि आनंदाने जगा.'' त्या सशाचे बोलणे सर्वांनाच पटले. आनंदाने उड्या मारीत ते आपापल्या घरी परतले.

## उपदेशकथा

### मातृभाषेचे महत्त्व

एकदा सरदार वल्लभभाई पटेल आपला मुलगा, सून व नातूसह महात्मा गांधींना भेटण्यास गेले होते. ते जेव्हा गेले तेव्हा गांधीजी जेवायला बसले होते. लहान मूल पाहताच त्याला गांधीजींनी एक गाकर दिला पण त्या बाळाच्या आईनं त्याच्या हातातून तो एकदम खेचून घेतला अन् ती त्याला म्हणाली, 'आधी थँक यू म्हण' पण ते लहान मूल काही 'थँक यू' म्हणेना. आईनं त्याला पुन्हा पुन्हा बजावलं, 'थँक यू' म्हण आधी तरच देईन गाकर.' शेवटी आपल्या बोबड्या बोलीत तो रागारागानं म्हणाला, 'ठेंकू !' हा तमाशा केव्हा संपतो त्याची गांधीजी वाटच पाहात होते. ते त्या बाळाच्या आईला म्हणाले, समुद्रालाच आग लागली तर सांगायचं कुणाला? तो एक दैवी कोपच समजायचा ना?' त्या बाईला काही गांधीजींचं म्हणणं उमजेना पण तिच्याजवळ असलेली दुसरी एक भगिनी म्हणाली, 'अहो, मुलाला तुम्ही गुजरातीऐवजी इंग्रजीत 'थँक यू' म्हणायला शिकवलंय ना, त्याच्यावर ही टीका आहे. बापूंची !' त्यावर गांधीजी म्हणाले, 'छे, छे मी टीका नाही करीत पण परभाषेच्या गुलामीचं विष किती खोल गेलंय याचा विचार करतो. ही मुलगी तर सरदार वल्लभभाईंची अर्थात एका देशभक्ताची सून. माझ्या दृष्टीनं हिला बिचारीला इंग्रजीचं फारसं ज्ञान नाहीच पण तरीसुद्धा आपल्या मुलाला इंग्रजी शब्द शिकवायचा तिचा असा दुराग्रहच असल्यावर कुणाला बोल लावायचा !' ते पुढे म्हणाले, 'जर आमच्या माताच हा भाषेचा गुंता उकलू शकल्या तर आपण मात्र इंग्रजीच्या बेडीतून मुक्त होऊ अन् मातृभाषा किंवा राष्ट्रभाषा यांचा विकास करू शकू.'

कथा उपदेश : इंग्रजीचे महत्त्व वाढते असले तरी मातृभाषा कमी महत्त्वाची नाही. तिचा उपयोग जास्तीत जास्त केला पाहिजे.

## पंचांग

| पंचांग | करण:बव २७:३९:००+ |
|---|---|
| १ फेब्रुवारी २०२५ | सूर्य:मकर |
| रविवार | चन्द्र:कर्क |
| विक्रम संवत्– २०८२ | हिजरी सन् – १४४५ |
| माघ शके संवत्– १९४७ | मुस्लिम मास – शाबान |
| संवत्सर – विश्वावसूनाम | तारीख – १२ |
| अयन– उत्तरायणारंभ | विशेष |
| मास– माघ | माघ पौर्णिमा |
| ऋतु– सौर शिशिर | माघस्नाथ मसाप्ती |
| शुक्ल पक्ष | चित्रऋषी यात्रा– |
| तिथि:पूर्णिमा | ताटसावळी (वर्धा) |
| २७:३९:००+ | अवलिया महाराज यात्रा– |
| नक्षत्र:पुष्य २३:५७:४४ | काळामाथा (मालेगाव) |
| योग:प्रीति १०:१८:०६ | गुरू रविदास जयंती |
| करण:विष्टि १६:४३:०० | रथयात्रा मंगेशी – गोवी |

## दैं.'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 6 | | | 4 | 7 | | |
| | 5 | 4 | 7 | | | 2 | | 1 |
| 7 | | | 1 | 2 | | | | |
| 3 | | | | 1 | | | | |
| 1 | 9 | 8 | | 6 | | 3 | 7 | 5 |
| | | | | 5 | | | | 4 |
| | | | | 7 | 3 | | | 9 |
| 4 | | 3 | | | 1 | 5 | 2 | |
| | | 1 | 2 | | | 8 | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८४६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 4 | 6 | 9 | 5 | 8 | 2 | 1 |
| 1 | 6 | 2 | 7 | 4 | 8 | 3 | 5 | 9 |
| 8 | 5 | 9 | 3 | 2 | 1 | 4 | 7 | 6 |
| 5 | 1 | 3 | 2 | 8 | 6 | 7 | 9 | 4 |
| 4 | 2 | 7 | 9 | 5 | 3 | 6 | 1 | 8 |
| 9 | 8 | 6 | 4 | 1 | 7 | 5 | 3 | 2 |
| 6 | 4 | 5 | 1 | 3 | 2 | 9 | 8 | 7 |
| 3 | 7 | 1 | 8 | 6 | 9 | 2 | 4 | 5 |
| 2 | 9 | 8 | 5 | 7 | 4 | 1 | 6 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६६२ – ९ महिने वेढा घातल्यावर चीनच्या सेनापती कॉक्सिंगाने तैवान जिंकले.
- १७९० – न्यूयॉर्कमध्ये अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे पहिले सत्र सुरू झाले.
- १७९३ – फ्रांसने नेदरलँड व युनायटेड किंग्डम विरुद्ध युद्ध पुकारले.
- १८१४ – फिलिपाईन्सच्या मेयोन ज्वालामुखीचा उद्रेक १,२०० ठार.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – टेक्सास अमेरिकेपासून विभक्त झाले.
- १८८४ – ऑक्सफर्ड ईंग्लिश डिक्शनरीची पहिली आवृत्ति प्रकाशित.

### राष्ट्रीय

- १९९२ – भोपाळच्या मुख्य न्यायाधीशांनी युनियन कार्बाइडचा मुख्य अधिकारी वॉरेन अँडरसनला फरारी घोषित केले.
- २००७ – अपहरण प्रकरणात वाराणशी येथे दोन महिलांसह ११ जणांना जन्मठेप.

### जन्म

- १८८२ – लुई स्टीवन सेंट लॉरें, कॅनडाचा १२वा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९०१ – क्लार्क गेबल, अमेरिकन अभिनेता यांचा जन्म.
- १९३१ – बोरिस येल्त्सिन, रशियाचा अध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- १६९१ – पोप अलेक्झांडर आठवा यांचे निधन.
- १७३३ – ऑगस्टस दुसरा, पोलंडचा राजा यांचे निधन.
- १९०८ – पोर्तुगालचा राजा यांचे निधन.
- २००३ – स्पेस शटल कोलंबियातील अंतराळवीर – मायकेल पी. अँडरसन, डेव्हिड ब्राउन ,कल्पना चावला,लॉरेल क्लार्क, रिक डी. हसबंड,विली मॅककूल ,इलान रमोन यांचे निधन.

## : SMS :

Sardar apna sar pani me duba rha tha..
Biwi-kya kr rhe ho?
Sarder-Dimag chalta nhi he sala..
Dekh rha hu kahi Puncher to nhi?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.३ | १६.९ |
| अहमदनगर | २७.१ | १५.९ |
| अकोला | २९.८ | १६.७ |
| अमरावती | २८.९ | १७ |
| बीड | ३०.३ | १६.८ |
| भंडारा | २९.१ | १६ |
| बुलढाणा | १८.४ | ९.८ |
| चंद्रपूर | ३०.२ | १७.६ |
| चेन्नई | २९.६ | २१.९ |
| नवी दिल्ली | १८.५ | १० |
| धुळे | २९.५ | १८.७ |
| गोंदिया | २८.६ | १६.३ |
| जळगाव | २९.३ | १४.६ |
| कोल्हापूर | २८.५ | १७.८ |
| लातूर | २८ | १९ |
| मुंबई | ३२.३ | २४.४ |
| नागपूर | २८.५ | १६.७ |
| नांदेड | २९.२ | २०.५ |
| नंदूरबार | २६.६ | १८.३ |
| नाशिक | २८.१ | १७.३ |
| पुणे | २७.४ | १७.१ |
| पंढरपूर | २९.१ | १९.८ |
| सातारा | २८.६ | १३.७ |
| सांगली | २९ | १८ |
| सोलापूर | २९.१ | २०.९ |
| वर्धा | २९.६ | १६.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** प्रवास सुखकर होईल. आपल्या वृत्त्वावर सभोवतालच्या व्यक्ती हुरळून जातील. आपले ध्येय साध्य करता येईल.

**तुळ :** कामाचा ताण जाणवणार नाही. वैयक्तीक उत्कर्षाच्या दृष्टीने हा आठवडा आपणांस अतिशय शुभफलदायी ठरेल.

**वृषभ :** तरुणांच्या कौशल्याला चांगला वाव मिळेल. स्वत:ची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सतत कार्यरत प्रयत्नशील राहाल.

**वृश्चिक :** अनपेक्षित धनलाभ झाल्याने आश्चर्याचा धक्का बसेल. काही प्रभावी लोकांनी मदत केल्याने उत्साह वाटेल.

**मिथुन :** शैक्षणिक क्षेत्रात चांगली प्रगती साधता येईल. उच्चशिक्षणासाठी प्रवेश मिळेल. सामाजिक कार्यात आपल्याला योग्य प्रतिसाद मिळेल.

**धनु :** आपल्या बुद्धीचातुर्यावर मोठी मजल माराल. व्यवसाय–उद्योगातील आत्मविश्वास व कामाचा वेग वाढेल.

**कर्क :** आरोग्याच्या जुन्या तक्रारी डोकेवर काढतील. नेत्रविकार, उष्णतेचे विकार यांच्यापासून त्रास होण्याची शक्यता आहे. गृह सजावट करतील.

**मकर :** रचनात्मक कामातून लाभ होतील, जवळचे प्रवास सुखाचे करणारा आहे. भावाबहिणींशी संबंध चांगले राहतील. अनेकांचे सहकार्य लाभेल.


**सिंह :** आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल. नवपरिणीतांना गोड बातमीची चाहूल लागेल. स्पर्धापरीक्षांतून चांगले यश लाभेल.

**कुंभ :** भविष्यकाळाच्यादृष्टीने आर्थिक तजवीज करणे शक्य होईल. व्यावसायिक प्रदर्शनातून चांगला लाभ घडून येईल.

**कन्या :** संततीच्या उत्कर्षाची वार्ता कानी येईल. जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक शुभ–समारंभाचे आयोजन केले जाईल.

**मीन :** मिष्टान्न भोजनाचे योग येतील. आपल्या इच्छा, आकांक्षा कृतीत आल्यामुळे समाधान लाभेल. गुंतवणूकीतून लाभ होतील.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४७



**आडवे शब्द**

१. झोपण्याची सोय
६. धमकी, दीर्घ श्वास
८. धमनी
९. भारताचे 'नन्हे' माजी पंतप्रधान
१२. मनाची घालमेल
१५. डळमळीत, अस्थिर
१६. जाडसर पीठ
१७. पायाचे थरथरणे
१९. पूर्वी ही देखील पित
२२. रुग्णालय
२५. बंगाली रुपाया
२७. युवक
२९. अग्र, निमुळता भाग
३०. बालतरु
३१. डोंगरातील वाट
३२. हाडांचा सांगाडा
३४. भीषण (हास्य)
३५. दचकणे, चकित होणे
३६. उपस्थित
३८. व्रात्य, निरुद्योगी, भटक्या
३९. हालचालीवर ठेवलेली नजर
४०. उद्याच्या नंतरचा दिवस
४१. वात्रट
४३. शिव्याशाप
४५. निद्रा, झोप
४७. पांढरपेशा
५२. कान, अंगराज
५४. चर्चा
५५. नशीब, दैव (इंग्रजी)
५७. घर
५९. मस्ती, गर्व
६०. हिमत, धैर्य
६२. लखलख, अभ्रकाचा चुरा
६५. बाई
६६. साखरेची फुगीर वडी
६८. सोने
६९. पूर्वज
७१. ठिबकणारा, गळणारा
७२. माफी मागणारा
७४. वनस्पतीजन्य रत्न
७५. कपाळ,७६. मगर
७७. वर–वधूची मिरवणूक
७९. तिघांमध्ये
८१. वजन, बोजा
८२. तारणारा
८३. निगरगट्ट, व्रात्य
८४. प्रत्येक (टप्प्यावर)

**उभे शब्द**

१. पहाट होण्यापूर्वी हा सर्वाधिक घनगर्द असतो
२. 'हा --- सोड सखे, पुरे हा बहाणा'
३. घट्ट विणीचे, गंभीर
४. रशिया (हिंदी)
५. केस काळे करण्याचे साधन
६. किंमत
७. दिवटी, उजेडाचे साधन
९. ढापणे, लुबाडणे
१०. रखेली, दासी
११. भीक मागणे
१३. तंट्यातील मध्यस्थ
१४. स्त्री, बाई
१५. फसवा राग–लोभ
१८. नखरेल चाल
२०. गार वाऱ्याची झुळूक
१८. नखरेल चाल
२०. गार वाऱ्याची झुळूक
२१. माहीतगार
२३. गोलाकार
२४. पूर्ण जळणे
२६. सडसडीत
२८. आधी 'चोर' लावल्यास चोरांपासून सुरक्षित
३०. रोख रक्कम
३१अ. थाप, वावडी
३३. पाढे, पाठाची उजळणी
३४. च्या शिवाय
३५. ढीग, चवड
३७. लावणीतील तारुण्य
४०. झटकन
४२. रायगडावरील कडा
४४. शोध
४६. वेगाने
४८. आवड
४९. ही पैशानेच मोजता येते असे नाही
५०. नेहमी
५१. दिल्लीचे विमानतळ
५३. तपस्या
५६. वैतागवाणी बडबड, किरकिर
५८. करुणा, कीव
६१. मनाचा थकवा
६३. दुसऱ्याचे मनातील भाव ओळखणारा
६४. पश्चाताप
६६. खादाड राक्षस
६७. अक्षर ओळख
६९. बुवामहाराज
७०. दूरदेशी वास्तव्य
७३. मागणारा
७४. फरक, तफावत
७५. शपथ
७८. कौसल्यापुत्र
८०. छंद, व्यसन

**जम्बो शब्दकोडे क्र. ८४६ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.नाशवंत ३.वसुंधरा ५.आडमिळकत ९.फासा १०.माकड १२.मळ १३.माननीय १६.गाळसाळ १८.यमसदनाला पाठविणे २४.राका २५.दानपत्र २७.नाविक दल २८.रमावर ३०.सुळका ३१.माता ३२.वण ३३.रसना ३४.जमा ३६.नाद ३७.राधा ३८.हवन ३९.राजीव लोचन ४०.खरडपट्टी ४२.परि ४३.कास ४५.तव ४६.येन ४७.राबता ४८.मनमुराद ५०.ताई ५२.दास ५३.जंगली जनावर ५५.महाशय ५७.नकार ५९.बासरी ६०.दम ६१.लगत ६३.करारमदार ६४.पारावार ६५.महाराज ६६.कारभार

उभे उत्तर : १.नाममात्र २.वंदनीय ३.वसा ४.रमा ५.आड ६.मिसळ ७.कमळ ८.तळ ११.कवठ १४.यमसदन १५.विनाकारण १६.गाणे १७.सामानसुमान १९.दरा २०.पाचावर धारण बसणे २१.विष २२.पत्रकार परिषद २३.कविता २६.पळ २७.नामनिराळा २९.रस ३२.वदन ३४.जव ३५.अवयव ३६.नाचता येईना ३७.राख ३८.हट्टी ४१.पल्ला ४३.कान ४४. समुदाय ४५.तवंग ४८.मनोहारी ४९.रास ५०.ताजगी ५१.सरकार ५३.जंगल ५४.वनराज ५५.मस ५६.समरस ५८. रमणी ५९.बारका ६०.दवा ६२.तम ६३.करा ६४.पार

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे सामर्थ्य स्त्रियांमध्ये वैदिक काळापासून : अंजली पर्वते



■ श्री देवदेवेश्वर संस्थान सारसबागच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : इतरा (ऐतरेय), जबाला, मदालसा, चुडाला, अपाला, विश्पला या तेजस्वी स्त्रिया प्राचीन भारतात होऊन गेल्या. समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे सामर्थ्य त्याही काळात स्त्रियांमध्ये होते. समाजात कर्तृत्व सिद्ध करणारी आणि स्वत्व जपायचे शिक्षण देणारी स्त्री त्याही काळात भारतात होती. तेजाला वय, जात, माणूस किंवा प्राणी याचे बंधन नसते, हे आपल्या प्राचीन भारताच्या इतिहासात पाहिल्यावर लक्षात येते, असे मत प्राचीन भारताच्या अभ्यासिका लेखिका डॉ. अंजली पर्वते यांनी व्यक्त केले. श्री देवदेवेश्वर संस्थानच्या वतीने डॉ. अंजली पर्वते यांचे 'प्राचीन भारतातील तेजस्वी स्त्रिया' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी श्री देवदेवेश्वर संस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश भागवत, संस्थानचे विश्वस्त सुधीर पंडित, पुष्कर पेशवा, जगन्नाथ लडकत, आशिष कुलकर्णी उपस्थित होते. डॉ. अंजली पर्वते म्हणाल्या, प्राचीन भारतात लोखंडी पाय जिला बसवला होता अशी विश्पला नावाची स्त्री होती. जिने युद्ध करून राज्याचे थांबवलेले पाण्याचे प्रवाह मोकळे केले आणि राजाचा तसेच जनतेचा आदर मिळवला. अपाला जिला कुष्ठरोग असल्यामुळे तिच्या पतीने स्वीकारण्यास नकार दिला. त्यावेळी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. इतरा या त्या काळातील खालच्या जातीतील स्त्रीने आपल्या आणि मुलाच्या स्वतःसाठी लढा देऊन महिदास या तिच्या पुत्राने ऐतरेय ब्राह्मण ग्रंथाची निर्मिती ज्ञान अर्जित करून केली. स्वत्व टिकवायला शिकविणारी जबाला तसेच केवल भौतिकच नाही तर आध्यात्मिक उन्नतीचा मुलांना उपदेश देणारी मदालसा ही देखील तेजस्वी स्त्री होती. त्यापुढे म्हणाल्या, चूडाला ही प्राचीन भारतातील अत्यंत तेजस्वी, बुद्धिमान स्त्री होती, जिने आपल्या पतीला राजा शिखिध्वज ला गुरु बनून उपदेश केला. हनुमानाची माता अंजनी तसेच ऋग्वेदातील देवशुनी सरमा या देखील प्रत्यक्ष मानवी नसणाऱ्या तेजस्वी स्त्रिया दैवी स्त्री शक्तीचे प्रतीक आहेत.

### 'जाने अनजाने हम मिले'मधील अत्याचारदृश्याचा 'हायवे'शी खास संबंध



पुणे (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेत भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) मुख्य भूमिकेत आहेत. या मालिकेत अलीकडेच एक अत्यंत संवेदनशील आणि प्रभावी दृश्य दाखवले गेले, ज्यात सेहज राजपूतने साकारलेल्या उन्नती ह्या व्यक्तिरेखेवर शारीरिक अत्याचार होतो.हे दृश्य मालिकेतील केवळ एक महत्त्वाचा टप्पा नाही, तर सेहज राजपूतसाठी त्याचे चित्रीकरण करणेही अत्यंत आव्हानात्मक ठरले.एपिसोडमध्ये, उन्नतीचा मार्ग काढत एक स्कॅमर (फसवणूक करणारा व्यक्ती) पार्टीत तिच्यावर हल्ला करतो. नुकत्याच प्रसारित झालेल्या या दृश्यातून त्या घटनेनंतर उन्नती कोणत्या खोल मानसिक आघातातून जाते हे ठळकपणे समोर येते. कॅमेऱ्याच्या मागेही हे चित्रीकरण सेहज राजपूतसाठी तितकेच कठीण होते कारण इतक्या तीव्रतेचे दृश्य तिने प्रथमच साकारले. अभिनेत्री म्हणून ती मानसिकदृष्ट्या तयार असली तरी शारीरिक अत्याचाराचे चित्रण करणे तिच्यावर भावनिकदृष्ट्या मोठा परिणाम करून गेले. त्या अनुभवाबद्दल बोलताना सेहज म्हणाली, "हे दृश्य माझ्यासाठी विशेषतः आव्हानात्मक होते कारण यात खूप शारीरिक हालचाली कराव्या लागल्या. त्या हल्लेखोराचा सामना करावा लागला आणि त्याला दूरही ढकलावे लागले. आमच्या दिग्दर्शकांनी ही पूर्ण प्रक्रिया खूप सहज आणि सोयीस्कर केली आणि त्यामुळे माझ्यासाठी ते सोपे गेले. त्या दृश्यात मी पूर्णपणे त्या भावविश्वात गेले. हे दृश्य करताना माझ्यावर भावनिक परिणाम झाला आणि त्याचा मानसिक ताणही आला. पण कलाकार म्हणून प्रत्येक भावनेला पूर्णपणे अनुभवणे आणि जगणे हाच माझ्या मते या कलाविश्वाचा सर्वात सुंदर भाग आहे. अभिनेत्री म्हणून हे दृश्य अत्यंत आव्हानात्मक होते. इतक्या कठीण दृश्यात काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी खरंच कृतज्ञ आहे कारण अशीच दृश्ये कलाकार म्हणून तुमची खरी परीक्षा पाहतात." त्या दृश्यासाठी आपल्या प्रेरणेबद्दल सेहज म्हणाली, "त्या अर्थाने आलिया भट्ट माझ्यासाठी मोठी प्रेरणा ठरली आहे. 'हायवे' चित्रपटातील ते दृश्य — ज्यात तिच्या पात्राला अनेक वर्षे सहन करावा लागलेला अत्याचार ती उघड करते — हे मी माझ्या अभिनय वर्गात सादर केले होते, त्यामुळे त्या भावना मी आधीही सरावलेल्या होत्या. तरीदेखील, वास्तविक आयुष्यात अशा प्रसंगांचा विचार करणेही खूप भीतीदायक वाटते." पुढील भागांमध्ये उन्नतीच्या मनातील त्या भीषण घटनेच्या आठवणींमुळे तिला येणारे पॅनिक अटॅक आणि तिची अस्थिर, असुरक्षित अवस्थाही मालिकेत दाखवली जाणार आहे.उन्नतीच्या आघातातून सावरण्याच्या प्रवासात रीत आणि राघव तिच्या सोबत कसे ठामपणे उभे राहतातहे'जाने अनजाने हम मिले'या मालिकेच्या आगामी भागांतील मुख्य आकर्षण ठरणार आहे. पहा मनाची पकड घेणारे हे नाट्य'जाने अनजाने हम मिले' दररोज रात्री 10:30वाजता फक्त झी टीव्हीवर!

# 'मुळा–मुठा'साठी ठोस पाऊल उचलणार : राज भूषण

पुणे (दै. संध्या) :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारत सरकार देशातील सर्वच नद्यांच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष देत आहे. त्यानुसार पुण्याची जीवनवाहिनी असणाऱ्या मुळा–मुठा नदीतील प्रदूषण ही गंभीर समस्या आहे. नदीत प्रक्रिया न करता सोडण्यात येणारे सांडपाणी, तसेच थेट नदीपात्रात टाकण्यात येणारा कचरा या अत्यंत गंभीर बाबींची नोंद सरकार घेत आहे. भविष्यात स्थानिक महापालिकांच्या समन्वयातून 'नमामी गंगा' चळवळीप्रमाणे 'नमामी मुळा–मुठा' अशी योजना आखून नदी सुधार प्रकल्पांतर्गत ठोस पावले उचलणार आहोत, अशी माहिती केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांनी दिली.



ते येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे अंतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र नौदल शिक्षण व प्रशिक्षण अकादमी, पुणे (मॅनेट) या संस्थेच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमापूर्वी येथे पत्रकारांशी आयोजित वार्तालाप प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, प्रोव्होस्ट सायली गणकर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना चौधरी म्हणाले की, मुळा–मुठा नदीच्या प्रदूषणामुळे पुणे शहरातील भूजल पातळी, शेती तसेच नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. ही समस्या भविष्यात अधिक गंभीर होऊ नये, यासाठी केंद्र सरकारकडून सर्वंकष नदी सुधार प्रकल्प राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविणे, अवैध सांडपाणी जोडण्या तोडणे, तसेच औद्योगिक घटकांकडून होणाऱ्या प्रदूषणावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुळा–मुठा नदी स्वच्छतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जलगुणवत्ता तपासणीसाठी नियमित निरीक्षण यंत्रणा, तसेच नदीकाठावरील गावांकडून पात्रात कचरा टाकला जाऊ नये यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुळा–मुठा नदी ही केवळ पाण्याचा स्रोत नसून ती सांस्कृतिक व पर्यावरणीय वारसा आहे. त्यामुळे नदीचे संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून स्थानिक नागरिकांची सामूहिक जबाबदारी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

याशिवाय, एमआयटी एडीटी विद्यापीठासारख्या शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि युवकांचा सहभाग घेऊन व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येईल. "स्वच्छ नदी, सुरक्षित भविष्य" या संकल्पनेतून मुळा–मुठा नदीला पुन्हा एकदा निर्मळ व प्रवाही करण्याचा संकल्प केंद्र सरकारने केला असल्याचे राज्यमंत्री चौधरी यांनी सांगितले.

> एमआयटी एडीटी विद्यापीठ आणि प्रशासनाने कायमच मुळा–मुठा नदीचे वाढते प्रदूषण, तसेच नदीपात्रात मोठ्या प्रमाणात टाकला जाणारा कचरा या गंभीर विषयांकडे सातत्याने लक्ष वेधले आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून सातत्याने राज्य, केंद्र सरकार आणि स्थानिक प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मुळा–मुठा ही पुण्याची जीवनवाहिनी असून तिच्या रक्षणासाठी व स्वच्छतेसाठी सरकार व प्रशासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची विद्यापीठाची भूमिका आहे.
>
> — डॉ. महेश चोपडे, कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी–काळभोर, पुणे

## विवाहासाठी सजलेली कार्यालये ओस

पुणे (दै. संध्या) :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या दुःखद घटनेने बारामती तालुक्यातील जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले आहे. या घटनेचा परिणाम चक्क नियोजित विवाह समारंभांवरही झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पवार यांच्या निधनाची माहिती कळताच सर्वत्र शांतता पसरली आणि तालुक्यातील अनेक विवाह समारंभ केवळ धार्मिक विधी उरकून अत्यंत साधेपणाने लग्न पार पाडण्यात आले. सनई-चौघड्यांचे आवाज थांबले, वाजंत्री शांत झाल्या, कुठेही डामडौल नव्हता. विवाहासाठी सजलेली कार्यालये ओस पडली होती. आनंदाचा गजर असावा, अशा ठिकाणी फक्त नीरव शांतता अनुभवायला मिळाली. वडगाव निंबाळकर येथील अभिजित प्रदीप दरेकर यांचा शुभविवाह शिरवळ (ता. खंडाळा, जि. सातारा) येथे नियोजित होता. सकाळी उत्साहात निघालेल्या वऱ्हाडी मंडळींना सोशल मीडियावरून दादांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण वातावरण बदलले. काही नागरिक बारामतीकडे धाव घेऊन घटनेची खातरजमा करत होते. अखेरीस मोजक्या नातेवाइकांच्या उपस्थितीत हा विवाह साधेपणाने पार पडला. सदोबाचीवाडी (ता. बारामती) येथील अभिषेक कार्यालयात पुणे कर्वेनगर येथील करे व बरकडे कुटुंबांचा विवाह नियोजित होता. मात्र येथेही वाजंत्री माघारी गेल्या, गोडधोड टाळण्यात आले आणि साधा स्वयंपाक करण्यात आला. कोऱ्हाळे बुद्रुक येथील सिद्धिविनायक कार्यालयातही विवाह फक्त धार्मिक विधींनीच पार पडल्याची माहिती दत्तात्रेय गावडे यांनी दिली. दादांच्या निधनामुळे सर्वसामान्य नागरिकांनी आपला वैयक्तिक आनंद बाजूला ठेवून, समाजासाठी अखंड झटणाऱ्या नेतृत्वाला अशा अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली वाहिल्याचे या घटनांतून दिसून आले.

## आता पाण्याविना करा आपल्या कारची स्वच्छता; अभिनव इको-फ्रेंडली स्टार्टअप

मॅजिक कार्वो इंडिया एलएलपीच्या 'कारवो – वॉटरलेस कार स्पा' (carwo) ॲपचे अभिनेत्री उर्वशी रौतेला यांच्या हस्ते भव्य अनावरण

पुणे (दै. संध्या) :

पर्यावरण संरक्षण आणि जलसंधारणाच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल उचलत पुण्यातील तरुण उद्योजक साहिल अग्रवाल यांनी पाण्याविना वाहन स्वच्छतेसाठी अत्याधुनिक व इको-फ्रेंडली तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्यांच्या मॅजिक कार्वो इंडिया एलएलपी या कंपनीने विकसित केलेल्या 'कारवो – वॉटरलेस कार स्पा' (carwo) या मोबाइल ॲपचे अभिनेत्री उर्वशी रौतेला यांच्या करकमलांनी भव्य अनावरण करण्यात आले.

सध्या पारंपरिक पद्धतीने कार धुतल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होते आणि दरवर्षी लाखो लिटर पाणी वाया जाते. मात्र 'कारवो' (carwo) च्या वॉटरलेस तंत्रज्ञानामुळे एक थेंबही पाणी न वापरता कार पूर्णपणे सुरक्षित, चमकदार आणि प्रभावीरीत्या स्वच्छ करता येते. या अभिनव उपक्रमामुळे लाखो लिटर पाण्याची बचत होणार असून, जलटंचाईच्या पार्श्वभूमीवर ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.




साहिल अग्रवाल व त्यांची बहीण श्रुती अग्रवाल गेल्या दोन वर्षांपासून इको-फ्रेंडली कार केअर आणि क्लिनिंग सोल्यूशन्सच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. आज पुण्यात हजारो समाधानी ग्राहकांनी 'कारवो'च्या सेवांवर आपला विश्वास व्यक्त केला आहे. यासंदर्भात बोलताना साहिल अग्रवाल यांनी सांगितले की, पारंपरिक कार वॉशमुळे अनेक वेळा वाहनाच्या रंगावर परिणाम होतो तसेच पाण्याचे डागही राहतात. याच समस्यांवर उपाय म्हणून वॉटरलेस कार क्लिनिंग तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. सध्या 'वॉटरलेस कार स्पा' अंतर्गत केवळ बाह्य स्वच्छताच नव्हे, तर इंटिरियर क्लिनिंग, पॉलिशिंग, डिटेलिंग आणि संपूर्ण कार केअर सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

पुण्यापासून सुरुवात करून भविष्यात संपूर्ण देशभर 'कारवो' (carwo) ॲपच्या माध्यमातून वाहनांशी संबंधित सर्व सेवा एका प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. यासाठी अत्याधुनिक वेबसाइट व मोबाइल ॲप विकसित करण्यात आले आहेत.

या प्रसंगी अभिनेत्री उर्वशी रौतेला म्हणाल्या, "आजच्या काळात पर्यावरण संरक्षण आणि जलसंधारण ही काळाची गरज आहे. 'कारवो' (carwo) सारखे नाविन्यपूर्ण व इको-फ्रेंडली उपक्रम केवळ लाखो लिटर पाण्याची बचत करत नाहीत, तर शाश्वत विकासालाही चालना देतात. साहिल आणि त्यांची टीम समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत असून, अशा उपक्रमांना व्यापक पाठबळ मिळणे गरजेचे आहे."

## भारतातील आफ्टरमार्केट व ऑटो कॉम्पोनन्ट उद्योगाची झेप

> या तीन दिवसीय इव्हेण्टमध्ये कार्यशाळा व्यवस्थापन, आफ्टरमार्केट सेवा, ई-कॉमर्स, रिअल-टाइम वेईकल देखरेख इत्यादींवर माहितीपूर्ण सत्रे व प्रमुखांच्या चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येईल. या प्रदर्शनामध्ये स्पेअर पार्ट्स व कॉम्पोनन्ट्स, इलेक्ट्रॉनिक्स, डायग्नोस्टिक्स व रिपेअर सोल्यूशन्स, वर्कशॉप इक्विपमेंट, ईव्ही चार्जर्स, वेईकल केअर, ल्युब्रिकण्ट्स, डिजिटल सोल्यूशन्स व सर्विसेस् यामधील नाविन्यता पाहायला मिळेल.

पुणे (दै. संध्या) :

भारतातील ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उद्योग धोरणामधील सुधारणा, वाढत्या गुंतवणूका आणि झपाट्याने तंत्रज्ञानाचा अवलंब यासह विकासाच्या नवीन टप्प्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ऑटोमोटिव्ह कॉम्पोनन्ट मॅन्युफॅक्चुरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एसीएमए)च्या मते, ऑटो कॉम्पोनन्ट उद्योगाचा महसूल सध्या आर्थिक वर्ष 25 मध्ये 80.2 बिलियन अमेरिकन डॉलर्स आहे, तसेच आज ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उद्योगाचा महसूल 11.8 बिलियन अमेरिकन डॉलर्स आहे. कॉम्पोनन्ट उद्योगाचा महसूल 2030 पर्यंत 111 ते 200 बिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. स्थानिकीकरणाला चालना मिळण्यासोबत निर्यात संधी वाढत असताना ऑटो कॉम्पोनन्ट व आफ्टरमार्केट उद्योग जागतिक आफ्टरमार्केट यंत्रणांमध्ये विश्वसनीय व स्पर्धात्मक सहयोगी ठरत आहेत. ही पार्श्वभूमी पाहता, मेस्से फ्रँकफर्ट ट्रेड फेअर्स इंडिया व एसीएमएद्वारे आयोजित एसीएमए ऑटोमेकॅनिका न्यू दिल्ली 2026 प्रदर्शन यशोभूमी, इंडिया इंटरनॅशनल कन्वेंशन अँड एक्स्पो सेंटर (आयआयसीसी), द्वारका, दिल्ली येथे 5 ते 7 फेब्रुवारी 2026 पर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. मेक इन इंडिया, प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह स्किम्स आणि एफडीआय सुधारणा यांसारख्या उपक्रमांच्या पाठबळासह ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट व ऑटो कॉम्पोनन्ट्स उद्योग गुंतवणूकदारांचे मुख्यत्वे लक्ष वेधून घेत आहे. उद्योगाचा अंदाज आहे की क्षमता विस्तार, इलेक्ट्रिक गतीशीलता व निर्यातींमुळे या क्षेत्रात स्थिर गुंतवणूका होत आहेत, ज्यामुळे उत्पादन व नाविन्यता केंद्र म्हणून भारताची भूमिका अधिक प्रबळ होत आहे. भारतातील ऑटो कॉम्पोनन्ट व ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उद्योगासाठी प्रमुख आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा एसीएमए ऑटोमेकॅनिका न्यू दिल्ली 2026 च्या सहाव्या पर्वामध्ये 870 हून अधिक प्रदर्शक एकत्र येतील. हा मेळावा ओईएम, वितरक, गॅरेज मालक, फ्लीट ऑपरेटर्स, सेवा प्रदाता आणि आंतरराष्ट्रीय ग्राहकांसाठी एकत्र आणणारे प्रमुख प्लॅटफॉर्म ठरेल. इव्हेण्टपूर्वी आपले मत व्यक्त करत ऑटोमोटिव्ह कॉम्पोनन्ट मॅन्युफॅक्चुरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एसीएमए)चे डायरेक्टर जनरल श्री. विन्नी मेहता म्हणाले, "भारतातील ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उद्योग अधिक संरचित, दर्जा-केंद्रित आणि जागतिक स्तराशी संलग्न भविष्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. आर्थिक वर्ष 26 च्या पहिल्या सहामाहीत ऑटो कॉम्पोनन्ट उद्योगाचा महसूल 6.8 टक्के वाढीसह 41.2 बिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचला.

## पोटगी अपुरी पडू लागल्याने न्यायालयात अर्जांची गर्दी

पुणे (दै. संध्या) :

आई, उद्या शाळेत फी भरायची आहे, नाहीतर नाव काढतील, मला मित्रांसारखं कला तसेच खेळाचा क्लास लावायचा आहे..., मला खासगी शिकवणीला जाऊ दे ना... मुलांच्या या मागण्या ऐकताना अनेक एकल मातांचे डोळे पाणावतात. पतीपासून विभक्त राहणाऱ्या किंवा घटस्फोटानंतर पोटगीवर संसार करणाऱ्या महिलांसाठी वाढती महागाई ही रोजचीच लढाई बनली आहे. मिळणारी पोटगी महिन्याच्या मध्यापर्यंतच संपत असून, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजा भागवताना महिलांची अक्षरशः दमछाक होत आहे. महागाईच्या वाढत्या झळा सर्वसामान्य कुटुंबांनाही असह्य होत असताना विभक्त महिलांसाठी परिस्थिती अधिकच बिकट बनत चालली आहे. त्यामुळे शिवाजीनगर येथील कौटुंबिक न्यायालयात पोटगी वाढविण्यासाठी दाखल होणाऱ्या अर्जांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. पूर्वी ठरवलेली पोटगी आजच्या वास्तवाशी जुळत नाही. शाळेची फी, खासगी शिकवणी, वैद्यकीय खर्च, प्रवासखर्च, महागलेले अन्नधान्य, यामुळे महिलांच्या उत्पन्नाचा ताळमेळच बसत नाही. विशेषतः शहरी भागातील महिलांमध्ये ही समस्या अधिक तीव्रतेने जाणवत आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरातील खर्च जास्त असल्याने शहरी महिलांना पोटगी अपुरी पडत असल्याचे चित्र आहे.

# आयसीएमएआयचे देशाच्या आर्थिक सक्षमीकरणात महत्त्वपूर्ण योगदान

**रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि.चे अध्यक्ष व चीफ फायनान्शियल ऑफिसर रजनीश जैन : "RISE इंडिया लीडरशिप समिट 2026" संपन्न**

पुणे (दै. संध्या) :

काही वर्षांपूर्वीपर्यंत कॉस्ट अकाउंटंटचे कार्य हे कंपन्यांचे आर्थिक ऑडिट करणे आणि फायनान्शियल अकाउंटिंगपुरतेच मर्यादित होते. त्यामुळे या कामाला कंपन्यांच्या बॅक ऑफिस स्वरूपाचे स्थान प्राप्त झाले होते. मात्र बदलत्या काळात दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICMAI) मुळे या क्षेत्राचा व्याप आणि महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. आज देशातील लाखो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून देशाच्या आर्थिक उलाढालीत सुमारे पन्नास हजार कोटी रुपयांपर्यंतचे योगदान ICMAI मुळे शक्य झाले आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक सक्षमीकरणात ICMAI चे मोठे योगदान असून 'विकसित भारत' घडवण्यात संस्थेचा महत्त्वाचा वाटा असेल, असे प्रतिपादन रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेडचे अध्यक्ष व चीफ फायनान्शियल ऑफिसर रजनीश जैन यांनी केले.




दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICMAI) यांच्या वतीने पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या "RISE इंडिया लीडरशिप समिट" च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ICMAI चे करिअर काऊन्सेलिंग अँड प्लेसमेंट कमिटीचे अध्यक्ष CMA विनय रंजन, ICMAI चे उपाध्यक्ष नीरज जोशी, माजी अध्यक्ष बी.बी. नायक, CMA चैतन्य मोहरीर (सचिव – ICMAI-WIRC), CMA श्रीकांत इप्पलपल्ली (अध्यक्ष – ICMAI पुणे चॅप्टर) आदी मान्यवर उपस्थित होते.

रजनीश जैन म्हणाले की, ICMAI चे स्वरूप, कार्य आणि जबाबदाऱ्या काळानुसार बदलत आहेत. आज कॉस्ट अकाउंटंट्सचा कंपन्यांच्या प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला असून ICMAI ही देशाच्या आर्थिक विकासाला सकारात्मक दिशा देणारी संस्था ठरत आहे. उद्योग आणि ICMAI यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास केवळ कंपन्यांचाच नव्हे तर देशाच्या आर्थिक विकासालाही अधिक गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

CMA श्रीकांत इप्पलपल्ली म्हणाले की, तंत्रज्ञानासोबतच कंपन्या आणि व्यावसायिकांच्या गरजा वेगाने बदलत आहेत. आज देशात कॉस्ट अकाउंटंट्सची कमतरता जाणवत असून व्यवसायांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा प्रकारच्या परिषदांची अधिक गरज आहे.

CMA विनय रंजन यांनी सांगितले की, काही वर्षांपूर्वीपर्यंत भारताची ओळख पाश्चिमात्य कंपन्यांसाठी बॅक ऑफिस सेवा पुरवणारा देश अशी होती. मात्र आता ही प्रतिमा बदलत असून ICMAI आणि कॉस्ट अकाउंटंट्सचा देशाच्या आर्थिक उलाढालीत सुमारे दोन टक्के वाटा निर्माण झाला आहे. ICMAI मुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत असून 2047 पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या उद्दिष्टात संस्थेचा मोलाचा वाटा असेल. देशाची अर्थव्यवस्था 30 ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

बी.बी. नायक म्हणाले की, ICMAI चा मुख्य उद्देश हा व्यवसायवृद्धीसोबतच कंपन्या आणि व्यावसायिकांमध्ये गुणात्मक बदल घडवणे हा आहे. रजनीश जैन यांनी रिलायन्स जिओमध्ये घडवलेले सकारात्मक बदल तरुणांनी आणि कॉस्ट अकाउंटंट्सनी आदर्श म्हणून घ्यावेत, असेही त्यांनी सांगितले.

नीरज जोशी यांनी स्पष्ट केले की, बदलत्या काळानुसार अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात येत असून गुणवत्तापूर्ण कॉस्ट अकाउंटंट्स घडवणे ही काळाची गरज आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात तरुणांसमोरील आव्हाने लक्षात घेऊन ICMAI नव्या अभ्यासक्रमांची आखणी करत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिया चौधरी यांनी केले. CMA श्रीकांत इप्पलपल्ली यांनी प्रास्ताविक केले तर CMA चैतन्य मोहरीर यांनी आभार मानले.

उद्घाटनानंतर झालेल्या कॉस्ट अकाउंटिंग विषयक चर्चासत्रात चित्तरंजन चट्टोपाध्याय, राजेश शुक्ला, राजा मुखर्जी, संजय भार्गवे, हिमांशु दवे, अरिंदम दत्ता, एस.के. गुप्ता, पूजा शेळके, रजनीश पांडे, डी.व्ही. जोशी, अजय महाजन, दिनेश कुमार वर्मा, हितेश माहेश्वरी, अवधूत उपाध्ये, मिलिंद जोगळेकर, अमित आपटे आदी मान्यवरांनी "ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स (GCCs) मधील धोरणात्मक नेतृत्व : मूल्यनिर्मितीचे शिल्पकार म्हणून CMAs" या विषयावर मार्गदर्शन केले.

या परिषदेच्या माध्यमातून GCCs ची बदलती भूमिका आणि कॉस्ट व मॅनेजमेंट अकाउंटंट्स (CMAs) यांचे वाढते धोरणात्मक योगदान अधोरेखित करण्यात आले. परिषदेत विविध आघाडीच्या GCC कंपन्यांचे प्रतिनिधी, CFOs तसेच HR प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादनातून भारताच्या विकासाला नवी चालना

**भारत–युरोपियन युनियन 'मदर ऑफ ऑल डील्स' करारामुळे बाजारपेठ प्रवेश व निर्यातीस ऐतिहासिक गती**

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

26 फेब्रुवारी ते 2 मार्च 2026 दरम्यान बंगळुरू येथील बेंगळुरू इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर (BIEC) येथे INDIAWOOD 2026 या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या या द्वैवार्षिक प्रदर्शनाची ही 26 वी आवृत्ती असून, लाकूड प्रक्रिया, फर्निचर उत्पादन व मॅट्रेस निर्मिती क्षेत्रातील एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद म्हणून INDIAWOOD ओळखली जाते. या प्रदर्शनाला युरोपियन फेडरेशन ऑफ वुडवर्किंग मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स (EUMABOIS) यांचे अधिकृत पाठबळ आहे.

आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती ठरणाऱ्या INDIAWOOD 2026 मध्ये 50 हून अधिक देशांतील 1,000 पेक्षा जास्त ब्रँड्स सहभागी होणार आहेत. सुमारे 90,000 हून अधिक उद्योग व्यावसायिकांची उपस्थिती अपेक्षित असून, 85,000 चौरस मीटर क्षेत्रफळावर हे प्रदर्शन भरवले जाणार आहे. मागील आवृत्तीच्या तुलनेत सुमारे 15 टक्क्यांची वाढ या प्रदर्शनातून दिसून येते. भारताच्या उत्पादन क्षमतेवरील वाढता जागतिक विश्वास आणि 'विकसित भारत' या दृष्टीकोनाशी सुसंगत अशी ही घडामोड आहे, ज्यामध्ये प्रगत उत्पादन, निर्यात व जागतिक एकात्मता हे प्रमुख विकास चालक आहेत.

आगामी प्रदर्शनाबाबत न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या व्यवस्थापकीय संचालक सोनिया प्रशर यांनी सांगितले, "INDIAWOOD 2026 हे भारतातील लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादन उद्योगातील वाढता आत्मविश्वास, परिपक्वता आणि जागतिक महत्त्वाकांक्षा यांचे प्रतीक आहे. आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती म्हणून हे प्रदर्शन भारताला विश्वासार्ह उत्पादन केंद्र व जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचा घटक म्हणून अधिक बळकटी देईल. आंतरराष्ट्रीय सहभागासह तंत्रज्ञान, शाश्वतता आणि कौशल्य विकासावर दिलेला भर हा उद्योग जागतिक स्पर्धेसाठी सज्ज असल्याचे दर्शवतो."

धोरणकर्त्यांनी 'मदर ऑफ ऑल डील्स' असे संबोधलेल्या भारत–युरोपियन युनियन मुक्त व्यापार करारामुळे (FTA) भारतीय लाकूड प्रक्रिया व फर्निचर उद्योगासाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. या करारामुळे युरोपियन बाजारपेठांमध्ये सुलभ प्रवेश, बहुतेक व्यापार वस्तूंवरील शुल्कात कपात किंवा रद्दबातल, तसेच इंजिनिअर्ड वुड उत्पादने व घटकांच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. प्रगत मशिनरी आणि औद्योगिक इनपुट्सच्या सुलभ उपलब्धतेमुळे नवोन्मेष, निर्यात व आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती मिळणार असून, या सर्व प्रक्रियांमध्ये INDIAWOOD सातत्याने महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

INDIAWOOD 2026 मध्ये कॉम्पॅक्ट दरवाजे व फिटिंग सिस्टिम्सकडे होत असलेल्या संक्रमणावर विशेष भर देण्यात येणार आहे. यामुळे उच्च अचूकतेचे अभियांत्रिकी, कच्च्या मालाचा कार्यक्षम वापर आणि आधुनिक उत्पादन प्रक्रियांशी सुसंगत एकात्मता साधता येते. प्रदर्शनात वुड ग्रेन, व्हिनिअर, रॅटन आणि फॅब्रिक-लुक पृष्ठभाग यांसारख्या निसर्गप्रेरित साहित्यांसह प्रगत सर्फेस तंत्रज्ञान सादर करण्यात येणार आहे. शाश्वतता, एकसमान गुणवत्ता आणि डिझाइन लवचिकतेसाठी असलेल्या जागतिक मागणीला ही उत्पादने उत्तर देतात.

शाश्वतता हा या प्रदर्शनाचा प्रमुख केंद्रबिंदू राहणार आहे. प्रमाणित लाकूड, जैव-आधारित ॲडहेसिव्हज, कमी उत्सर्जनाची उत्पादने आणि आंतरराष्ट्रीय मानकांनुसार जबाबदार उत्पादन पद्धती यांचे विशेष प्रदर्शन होणार आहे. व्यावसायिक व संस्थात्मक वापरासाठी ध्वनीशोषक आणि कार्यक्षमतेवर आधारित इंटिरियर सोल्यूशन्सदेखील सादर केली जातील.

तंत्रज्ञानाच्या पातळीवर INDIAWOOD 2026 मध्ये ऑटोमेशनवर आधारित उत्पादन सोल्यूशन्स, कॉम्पॅक्ट व अपग्रेड करता येणारी मशिनरी, प्रगत CNC प्रोसेसिंग तसेच डिजिटल उत्पादन नियोजन व इंटिग्रेशन टूल्स सादर करण्यात येतील. या तंत्रज्ञानामुळे उद्योगाला इंडस्ट्री 4.0 आणि स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंगकडे वाटचाल करता येईल. उत्पादकता, स्केलेबिलिटी आणि ऑपरेशनल कार्यक्षमतेत वाढ होण्यास याचा मोठा फायदा होणार आहे.

'मेक इन इंडिया' उपक्रमासोबत उच्च दर्जाच्या उत्पादनावर दिलेला भर INDIAWOOD ला असे व्यासपीठ बनवत आहे, जिथे भारतीय उत्पादन क्षमता जागतिक तंत्रज्ञान, साहित्य आणि सर्वोत्तम पद्धतींसोबत एकत्र येतात.

प्रदर्शनाला अधिक बळ देण्यासाठी Wood+ in Architecture & Design (WAD) ही एकदिवसीय विशेष परिषद 27 फेब्रुवारी रोजी आयोजित केली जाणार आहे.

या परिषदेत क्युरेटेड कीनोट सत्रे आणि पॅनल चर्चा असतील, ज्यामध्ये आर्किटेक्चर, बांधकाम आणि शाश्वत डिझाइनमध्ये लाकडाच्या वाढत्या भूमिकेवर चर्चा केली जाईल. उत्पादक, आर्किटेक्ट्स आणि डिझायनर्स यांच्यातील संवाद वाढवून बदलत्या वापर गरजांशी उत्पादन क्षमता सुसंगत करण्याचा हा प्रयत्न आहे.

INDIAWOOD मध्ये कौशल्य विकास हा कायमच एक महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला असून, जागतिक दर्जाच्या उत्पादन मानकांसाठी कामगारवर्ग तयार करण्यावर विशेष लक्ष दिले जाते.

INDIAWOOD सोबतच आयोजित होणारे इंडिया मॅट्रेसटेक अँड अपहोल्स्ट्री सप्लाइज एक्स्पो (IME) हे मॅट्रेस आणि अपहोल्स्ट्री उत्पादनासाठी भारतातील एकमेव समर्पित B2B ट्रेड फेअर आहे. 120 हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड्सच्या सहभागासह, वेगाने वाढणाऱ्या स्लीप आणि अपहोल्स्ट्री क्षेत्रासाठी विशेष मशिनरी, साहित्य आणि उत्पादन सोल्यूशन्स येथे सादर करण्यात येतील. 2018 मध्ये न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांनी INDIAWOODसह वुडवर्किंग पोर्टफोलिओचे अधिग्रहण करून 25 वर्षांच्या औद्योगिक वारशाला नवी दिशा दिली. त्यानंतर INDIAWOOD एक धोरणात्मक परिसंस्था म्हणून विकसित झाले असून, IME सारखी सह-व्यवस्था आणि MUMBAIWOOD, KOLKATAWOOD व CHENNAIWOOD या प्रादेशिक आवृत्त्यांचा त्यात समावेश आहे. 2030 पर्यंत सुमारे 40 अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची क्षमता असलेल्या फर्निचर बाजारपेठेशी सुसंगत असा हा हब-अँड-स्पोक मॉडेल आहे. आज INDIAWOOD परिसंस्था मशिनरी व उत्पादनापासून ते पृष्ठभाग, डिझाइन आणि अंतिम वापरापर्यंत संपूर्ण मूल्यसाखळी जोडते. INDEXPLUS, WAD आणि Surfaces@Work यांसारखी व्यासपीठे या परिसंस्थेला अधिक बळ देत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### 8 व्या राष्ट्रीय मास्टर गेम्स पोहण्याच्या स्पर्धेत रमेश जाधव यांना राष्ट्रीय सुवर्णपदक



■ जपान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर गेम्स स्पर्धेत प्रवेश निश्चित

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : सुपर मास्टर गेम्स अँड स्पोर्ट्स फेडरेशन यांच्या वतीने महाराष्ट्रात प्रथमच पिंपरी चिंचवड येथे ८ व्या राष्ट्रीय मास्टर गेम्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सांघिक व वैयक्तिक एकूण २३ खेळांचा समावेश आहे. पोहण्याच्या स्पर्धा २८ आणि २९ जानेवारी रोजी पिंपरी येथील आण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव मध्ये घेण्यात आल्या. यामध्ये ७० वर्ष पुढील पुरुष वयोगटातील पोहण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्र, पुणे, मोशी येथील केंद्रीय विहार सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक रमेश जाधव (वय ७३ वर्ष) यांनी राष्ट्रीय पातळीवरील अंतिम फेरीमध्ये एका सुवर्ण पदकासह एकूण ४ पदकांची कमाई केली. रमेश जाधव यांनी २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये सुवर्ण पदक, २०० मीटर फ्री स्टाईल मध्ये रौप्य पदक आणि फ्री स्टाईल १०० मीटर व ५० मीटर मध्ये ताम्र पदक पटकावले. सुपर मास्टर गेम्स अँड स्पोर्ट्स फेडरेशनचे कार्यकारी अधिकारी विनोद कुमार, महाराष्ट्र अध्यक्ष रामसिंग संघा, सरचिटणीस शैलेश फुलसुंगे यांच्या हस्ते रमेश जाधव यांना पदक देऊन गौरविण्यात आले. पोहण्याच्या स्पर्धेत ७० वर्षांपुढील पुरुष वयोगटात एकूण चार पदकांची कमाई करणारे रमेश जाधव हे महाराष्ट्रातील एकमेव स्पर्धक आहेत. पुढील वर्षी जपान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर गेम्स स्पर्धेत रमेश जाधव यांचा प्रवेश निश्चित झाला आहे. रमेश जाधव हे केंद्र सरकारच्या भारतीय ऊस संशोधन लखनऊ संचालित प्रवरानगर येथील जैविक नियंत्रण केंद्रामध्ये कीटक शास्त्रज्ञ, वर्ग १, या पदावरून निवृत्त झाले आहेत. तरुण वयापासूनच त्यांना पोहण्याची आवड होती. यापूर्वी त्यांनी २००५ मध्ये प्रवरानगर येथे झालेल्या महाराष्ट्र स्टेट मास्टर ॲथलेटिक्स चॅम्पियन स्पर्धेत पोहण्याच्या स्पर्धेत त्यांनी ताम्र पदक आणि २०२५ मध्ये पिंपरी चिंचवड येथे झालेल्या ६ व्या महाराष्ट्र स्टेट मास्टर गेम्स स्पर्धेमध्ये पोहण्याच्या स्पर्धेत एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदके पटकावली होती.

### जागतिक मानांकन कुस्ती स्पर्धेसाठी प्रा.दिनेश गुंड यांची निवड



पुणे (दैनिक संध्या) : जागतिक कुस्ती संघटनेच्या वतीने दि. २ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत क्रोएशिया (युरोप) येथे होणाऱ्या जागतिक मानांकन कुस्ती स्पर्धेसाठी प्रा.दिनेश गुंड यांची भारतीय कुस्ती संघाकडून तांत्रिक अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची गुंड यांची ही ६७ वी आंतरराष्ट्रीय स्पर्धा ठरणार असून, आतापर्यंत त्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर २०० हून अधिक तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ६७ स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. महाराष्ट्रातून इतक्या मोठ्या संख्येने आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणारे ते एकमेव तांत्रिक अधिकारी असल्याचे विशेष मानले जात आहे. या उल्लेखनीय निवडीबद्दल केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहळ, कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, सरचिटणीस योगेश दोडके, कार्याध्यक्ष संदीप आप्पा भोंडवे, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके, नवनाथ घुले व मारुती सातव यांनी प्रा.गुंड यांचे अभिनंदन केले. प्रा.दिनेश गुंड यांच्या या निवडीमुळे राज्यासह देशाच्या कुस्ती क्षेत्रातील मान उंचावला असून, नवोदित तांत्रिक अधिकाऱ्यांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.

## खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ॲड. निलेश आंधळे





**राजगुरूनगर (दै. संध्या) :**

खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ॲड.निलेश आंधळे, तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून नाजीम इनामदार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्ष स्थानी मावळते अध्यक्ष संजय शेटे होते. खेड तालुका पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा राजगुरूनगर येथील पुणे नाशिक महामार्गावरील शासकीय विश्रामगृहात मंगळवारी (ता.२६) पार पडली. ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष - ॲड.निलेश बाळासाहेब आंधळे, उपाध्यक्ष - आदेश भोजने, अतुल भालेराव, कार्याध्यक्ष - इसाक मुलाणी, सचिव - किरण खुडे, खजिनदार - प्रभाकर जाधव, सहसचिव - रोहिदास होले, प्रसिद्धी प्रमुख - नाजिम इनामदार, कायदेशीर सल्लागार - ॲड. सोमनाथ नवले, सल्लागार - बाळासाहेब सांडभोर, सुनील थिगळे, विद्याधर साळवे, वनिता कोरे, कार्यकारिणी सदस्य - महेंद्र शिंदे, राजेंद्र लोथे, दत्ता भालेराव, रोहिदास गाडगे, रामचंद्र सोनवणे, संजय शेटे, सदाशिव अमराळे, एम.डी.पाखरे, किशोर गिलबिले, सुभाष लोहोट.

## जीएस ग्लोबल अकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांनी साधला जागतिक विद्यापीठांशी थेट संवाद

**पुणे (दै. संध्या) :**

■ परदेशातील उच्च शिक्षणासाठी ५००हून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी



परदेशी शिक्षणासाठी मार्गदर्शन करणाऱ्या जीएस ग्लोबल अकॅडमीतर्फे आयोजित जागतिक विद्यापीठांशी थेट संवाद कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भांडारकर रस्त्यावरील संस्थेच्या कॅम्पसमध्ये जागतिक दर्जाच्या विविध विद्यापीठांसोबत थेट संवाद व विद्यार्थी प्रवेश अभियान यशस्वीपणे पार पडले. परदेशातील उच्च शिक्षणासाठी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य होता. या कार्यक्रमात विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या प्रतिनिधींनी तेथील अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, तसेच परदेशातील करिअर संधींबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. पुण्यातील विद्यार्थ्यांमध्ये परदेशी शिक्षणाविषयी वाढती उत्सुकता यामधून दिसून आली. या उपक्रमामुळे जीएस ग्लोबल अकॅडमीचे जागतिक विद्यापीठांशी असलेले नेटवर्क अधिक मजबूत झाले असून, विद्यार्थ्यांना थेट दर्जेदार शिक्षण संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. जीएस ग्लोबल अकॅडमीचे संस्थापक गणेश शिरसाठ बोलताना म्हणाले, "परदेशी शिक्षणासाठी सर्व प्रकारच्या सेवा आणि मार्गदर्शन देणाऱ्या जीएस ग्लोबल अकॅडमीमध्ये 'आयईएलटीएस', 'टोफेल', 'जीआरई', 'जीमॅट', 'सॅट' व 'पीटीई' यांसारख्या आंतरराष्ट्रीय परीक्षांसाठी प्रशिक्षण दिले जाते. सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, मॉक टेस्ट सुविधा, ग्रंथालय व स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध करून दिल्या आहेत. जर्मन, फ्रेंच व जापनीज व अन्य परदेशी भाषांचे प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास व सॉफ्ट स्किल्सचे मार्गदर्शन दिले जाते. अनुभवी समुपदेशकांकडून प्रवेशापासून व्हिसा, प्रवास व निवास व्यवस्थेपर्यंत संपूर्ण व वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात येते."

## माळी महासंघ मुंबई-कोकण विभागाचे स्नेहसंमेलन १ फेब्रुवारीला ऐरोलीत

**नवी मुंबई (दै. संध्या) :**



माळी समाजातील बांधव-भगिनींमध्ये एकता, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी वाढवण्यासाठी माळी महासंघ (महाराष्ट्र प्रदेश) च्या मुंबई-कोकण विभागातर्फे विभागीय स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. हे संमेलन रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता श्री संत सावता माळी मंडळ, संत सावता भवन, प्लॉट क्रमांक ३९, सेक्टर-९, ऐरोली, नवी मुंबई येथे होणार आहे.

माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सन्माननीय श्री. अविनाश ठाकरे साहेब हे या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली समाजाची एकता, विकास, नेटवर्किंग व भविष्यातील योजनांवर सखोल चर्चा होणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली.

प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अरुण तिखे , राष्ट्रीय कोषाध्यक्ष व प्रदेश सरचिटणीस नानासाहेब कांडलकर साहेब, राष्ट्रीय सचिव रविंद्र अंबाडकर , अप्पर कामगार आयुक्त रवीराज इळवे , श्री. प्रकाश माळी, श्री. डी. के. माळी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या स्नेहसंमेलनाचे मुख्य आयोजक म्हणून विभागीय अध्यक्ष दिनेश टाकरखेडे, राष्ट्रीय महिला अध्यक्ष वनिताताई लोंढे आणि विभागीय सचिव ॲड. माधव खेडे यांच्यासह विभागीय उपाध्यक्ष, सहसचिव, जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी जबाबदारी सांभाळत आहेत.

या स्नेहसंमेलनातून माळी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण, रोजगार संधी, सामाजिक एकता तसेच युवक-युवतींना परस्पर ओळख निर्माण होण्याची संधी मिळणार आहे. मुंबई-कोकण विभागातील माळी समाजासाठी हे संमेलन नव्या ऊर्जेचे केंद्र ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

सर्व माळी समाज बांधव-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन विभागीय अध्यक्ष दिनेश टाकरखेडे यांनी केले आहे.

## रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्ताने विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन





**ओतूर (दै. संध्या) :**

जुन्नर तालुक्यातील अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर कायमच अपघात होत असतात. या महामार्गावर अनेक निष्पाप जीव गेले आहेत. त्या अनुषंगाने ओतूर पोलीस स्टेशनच्या वतीने श्री सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शरदचंद्र फार्मसी कॉलेज येथे विद्यार्थ्यांना वाहन चालवताना मोबाईलवर बोलू नये. विना लायसन, विना इन्शुरन्स, विना हेल्मेट, विना सीट बेल्ट व मद्यपान करून वाहन चालू नये. या नियमांचे काटेकोर पालन करण्याबाबत सूचना दिल्या आहे. त्याचबरोबर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर लावावे. तसेच चिन्हांचे काटेकोर पालन करावे. रस्ता ओलांडताना झेब्रा क्रॉसिंगचा वापर करणे. या सर्व वाहतुकीच्या नियमा बद्दल मार्गदर्शन केले तसेच वाहन चालक-मालक यांची बैठक बोलावून वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे मार्गदर्शन केले.

# मराठी ZEE5 ओरिजनल सिरीज देवखेळमध्ये अंकुश चौधरी आणि प्राजक्ता माळी झळकणार, स्ट्रीमिंग सुरू

■ चंद्रकांत लता गायकवाड दिग्दर्शित आणि निखिल पालांडे तसेच गौरव रेळेकर लिखित, कोकणी लोककथांपासून प्रेरित,गूढ निर्मिती करणारा मानसशास्त्रीय गुन्हेगारी थरारपट; आता खास मराठी ZEE5वर स्ट्रीमिंग सुरू

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**




ZEE5चा नवीन मराठी ओरिजनल देवखेळचे स्ट्रीमिंग आता केवळ मराठी ZEE5वर सुरू होत आहे. चित्तवेधक मानसशास्त्रीय गुन्हेगारी थरारपटाची ही मालिका कोकणातील समृद्ध लोकपरंपरेतून प्रेरणा घेते आणि शिमगा (होळी) सणाच्या उत्कंठावर्धक पार्श्वभूमीवर श्रद्धा, भीती आणि मानवी विवेक यांच्या नाजूक भावनांचा शोध घेते. रत्नागिरी जिल्ह्यातील देवतालीच्या किनारपट्टीवरील गावावर आधारित, देवखेळचे कथानक एका थरारक परिस्थितीभोवती गुंफले आहे. दरवर्षी, होळी पौर्णिमेच्या रात्री एक मृत्यू होतो. कथा-कल्पनेत रमणारे गावकरी या मृत्यूंचे श्रेय शंकासुरला देतात. शंकासूर हे न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजले जाणारे एक पौराणिक लोक व्यक्तिमत्व आहे. जसजसे विधी सखोल होत जातात आणि विश्वास तर्कावर मात करू लागतो, तसतसे मौन हा जगण्याचा एक मार्ग बनतो. भय लोककथांच्या आड पिढ्यांनपिढ्या सत्य दडपून राहते.

दंतकथा हा हेतू म्हणून स्वीकारण्यास नकार देणाऱ्या इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या एंट्रीने कथेला निर्णायक वळण लागते. काळजीपूर्वक लपवून ठेवलेल्या गुन्ह्याचा तपास करत असताना, देवखेळ विश्वास आणि तर्कशास्त्र, परंपरा आणि सत्य यांच्यातील तणावपूर्ण मानसिक लढाई सुरू करतो. या मालिकेत इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या भूमिकेत अंकुश चौधरीसह, प्राजक्ता माळी, यतीन कार्येकर, अरुण नलावडे, वीणा जामकर आणि मंगेश देसाई यांच्या प्रमुख भूमिका आहेत. प्रीमियरपूर्वी, मुंबईत देवखेळच्या स्पेशल प्रिव्ह्यूचे आयोजन करण्यात आले. ज्यात मुख्य कलाकारमंडळी म्हणजे अंकुश चौधरी, प्राजक्ता माळी, शिवानी रांगोळे आणि सुबोध भावे यांच्यासह मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक प्रमुख चेहरे उपस्थित होते. प्रेक्षकांना शंकासुराच्या जगात पूर्णपणे बुडवून टाकल्याने हे प्रदर्शन यशस्वी ठरले. उत्सवांच्या काळात एक विशिष्ट स्थानिक स्पर्श जोडत, विशेष ब्रँडेडदेवखेळ-ZEE5 ऑटोरिक्षा प्रमुख आकर्षण ठरली. ही ऑटोरिक्षा मालिकेच्या खोलवर रुजलेल्या परंतु लक्षवेधी सौंदर्याला प्रतिबिंबित करते. मालिका आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद या दोन्हींबद्दल आपले विचार मांडताना अंकुश चौधरी म्हणाला, "देवखेळही कलाकृती रहस्यापेक्षा खूप अधिक आहे. विश्वास, भीती, शांतता आणि निवड यांना कशापद्धतीने आकार देतात याचा हा शोध आहे. विश्वास सरंजामे हे पात्र तर्कशास्त्र तसेच पुराव्यावर ठामपणे उभे राहते. तरीही ते श्रद्धा आणि शतकानुशतके जुन्या परंपरांचा पगडा असलेल्या जगाचा शोध घेते. स्क्रिनिंगदरम्यान माझ्या मनात विचार डोकावला; इथे असलेले प्रेक्षक किती गुंतून राहील; कथा कशी लक्षवेधक ठरेल. त्यांची शांतता बोलकी वाटली. ही सिरीज जरी लोककथांनी प्रेरित असली तरी ती केंद्रस्थानी असलेल्या मानवी मानसशास्त्र आणि नैतिक संघर्षाचा शोध घेते. इतका भक्कम, सकारात्मक प्रतिसाद पाहून मला खात्री पटली की कथा तिच्या मांडणीच्या पलीकडे खोलवर जोडली गेली आहे."या सिरीजमध्ये महत्त्वाची भूमिका साकारणारी प्राजक्ता माळी पुढे म्हणाली, "'देवखेळ'ला भावनिक वास्तववाद इतका आकर्षक बनवतो. हे समुदाय, विधी आणि भीती यांचे सहअस्तित्व कसे आहे आणि लोक अघोषित सत्य कशी जपून ठेवतात हे दर्शवते. कथानक हे लोककथांपासून प्रेरित असले तरी, ती एक काल्पनिक कथा आहे. ही कथा अंतर्गत संघर्ष आणि मानवी भावनांचा शोध घेण्यासाठी मिथकाचा पार्श्वभूमी म्हणून वापर करते. प्रेक्षकांसोबत पहिले काही भाग पाहताना भावूक झाले होते. त्यांची उत्सुकता, सहभाग आणि भावनिक संबंध अनुभवता आला. सांस्कृतिकदृष्ट्या रुजलेल्या परंतु मानसिक अंग असलेल्या सिरीजचा भाग होणे हा खरोखरच समृद्ध करणारा अनुभव आहे." उत्कंठावर्धक कोकणाच्या पार्श्वभूमीवरील मांडणी, लक्षवेधी कथाकथन आणि सूक्ष्म सादरीकरणासह, देवखेळ एक आकर्षक काल्पनिक कथा सादर करते. हे कथासूत्र विश्वासाची शक्ती आणि निर्विवाद भीतीची किंमत तपासते. ते प्रेक्षकांना दडवून ठेवलेले सत्य शोधण्याचे, प्रश्न विचारण्याचे आणि खुलाशाकरिता आमंत्रित करते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### "दादा मला माफ करा.." आमदार महेश लांडगे यांचे भावनिक वक्तव्य

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात आज स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेला विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शोकसभेमध्ये भारतीय जनता पक्षाचे भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. अवघ्या चाळीस सेकंदांच्या भाषणात त्यांनी भावनिक शब्दांत "दादा, मला माफ करा," असे म्हणत आपली भावना व्यक्त केली आणि तेथून मंचावरून निघून गेले. त्यांच्या या वक्तव्यामुळे उपस्थितांमध्ये क्षणभर शांतता पसरली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकांदरम्यान अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात तीव्र राजकीय संघर्ष पाहायला मिळाला होता. त्या काळात करण्यात आलेली टीका आणि एकेरी उल्लेख अजित पवारांच्या जिव्हारी लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात झाली होती. आजच्या शोकसभेत मात्र राजकीय मतभेद बाजूला ठेवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महेश लांडगे यांच्या भावनिक वक्तव्यामुळे या कार्यक्रमाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले असून, राजकारणापलीकडे जाऊन व्यक्त केलेली ही भावना असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

### अजितदादा पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा; संदीप वाघेरे यांची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे व दूरदृष्टीपूर्ण योगदान दिले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी आयुक्तांकडे केली आहे. आयुक्तांना दिलेल्या निवेदनात वाघेरे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका एक सक्षम, आर्थिकदृष्ट्या सबळ व औद्योगिकदृष्ट्या प्रगत महानगर म्हणून उभी राहण्यामागे अजितदादा पवार यांचे नेतृत्व व मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. पाणीपुरवठा योजना, रस्ते व वाहतूक व्यवस्था, औद्योगिक विकास, नागरी पायाभूत सुविधा, जलनिस्सारण व्यवस्था तसेच महापालिकेची आर्थिक शिस्त व बळकटीकरण यामध्ये त्यांनी वेळोवेळी घेतलेले निर्णय शहराच्या प्रगतीसाठी दिशादर्शक ठरले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे पिंपरी चिंचवड शहराला एक स्वतंत्र व सशक्त औद्योगिक आणि नागरी ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, यामुळे त्यांच्या कार्याची आठवण कायमस्वरूपी जपली जाईल तसेच भावी पिढीला सार्वजनिक सेवेसाठी प्रेरणा मिळेल. नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेबाबतचा प्रस्ताव मान्य करून संबधित विभागास त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत, अशी आग्रही मागणी संदीप वाघेरे यांनी केली आहे.

### पिंपरी चिंचवडच्या महापौर निवडीवर भाजप कार्यकारिणीत चर्चा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड भाजपच्या कार्यकारिणीची बैठक कासारवाडी येथे झाली. तीत महापौर निवडीसह महापालिकेतील आगामी सत्तास्थापनेच्या प्रक्रियेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात येणाऱ्या यादीसाठी सर्व भाजप नगरसेवकांच्या सह्या घेण्यात आल्या. महापौरपदासाठी इच्छुकांची नावे पक्षश्रेष्ठींकडे पाठविण्यात येणार असून, ही नावे बंद लिफाफ्यात देण्यात येणार असल्याची चर्चा बैठकीत झाली. सूत्रांच्या माहितीनुसार, या बंद लिफाफ्यात भाजपच्या आठ नगरसेवकांची नावे आहेत. पक्षश्रेष्ठींकडून या नावांवर अंतिम निर्णय झाल्यानंतर महापौरपदासाठीच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे. महापौरपदाचा निर्णय झाल्यानंतर सत्ताधारी पक्षनेता, तसेच स्थायी समिती अध्यक्षांच्या नावांची घोषणा करण्यात येणार असल्याचे भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. महापालिकेतील सत्तासूत्रे हाती घेताना संघटनात्मक समतोल आणि वरिष्ठ नेतृत्वाच्या सूचनांचा विचार करूनच निर्णय घेतला जाणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### नायगांवचे "सावित्रीनगर" असे नामांतर करावे; म. जोतिबा फुले मंडळाकडून मागणी

चिंचवड (दैनिक संध्या) : तमाम स्त्रियांचे ऊर्जास्त्रोत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव ता.खंडाळा जि.सातारा या जन्मगावाचे नामांतर करून त्या गावाचे नाव "सावित्रीनगर" असे करावे. अशी मागणी महात्मा जोतिबा फुले मंडळ पिंपरी चिंचवड यांच्या वतीने केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याकडे नुकतेच निवेदन सादर केले. आपणा सर्वांचे दृष्टीने अभिमानास्पद बाब म्हणजे सर्व मान्यवरांनी मंडळाने दिलेल्या नामांतराच्या ठरावाचे समर्थन केले . प्रथम मा.भुजबळ यांनी ठराव मांडला. त्यानंतर जयकुमार यांनी मागणीचे समर्थन करीत म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नायगांव ग्रामपंचायती कडून नामांतराचा ठराव आल्यावर तात्काळ नायगावचे " सावित्रिनगर " नामकरण करण्यात येईल,असे आश्वासन दिले . त्यामुळे नायगाव हे गाव भारताच्या इतिहासात वैशिष्ट्यपुर्ण ओळखीने अजरामर होणार आहे. महात्मा जोतिबा फुले मंडळांचे अध्यक्ष हणमंत माळी, अनिल साळुंके, सूर्यकांत ताम्हाणे यांच्या सह इतर पदाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

### दिघीत 2 फेब्रुवारीपासून प्रकट दिन महोत्सव

पिंपरी (दैनिक संध्या) : श्री संत गजानन महाराज (शेगाव) सेवाभावी सार्वजनिक ट्रस्ट, दिघी यांच्यावतीने श्री संत गजानन महाराजांचा १४८ वा प्रकट दिन महोत्सव आयोजित केला आहे. दि. २ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांनी हा महोत्सव साजरा करण्यात येईल. महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, हरिपाठ, भजन, जागर, पारायण व कीर्तनसेवेचे आयोजन केले आहे. या महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा भाविकांना लाभणार आहे. २ फेब्रुवारीला ह. भ. प. सुभाष महाराज लबडे (आळंदी), ३ फेब्रुवारीला ह. भ. प. श्रीकांत महाराज राऊत (अकोला), ४ फेब्रुवारीला ह. भ. प. समर्थ महाराज गावंडे (अमरावती), ५ फेब्रुवारीला ह. भ. प. रामचंद्र महाराज इंगोले (अकोला), ६ फेब्रुवारीला ह. भ. प. महादेव महाराज आव्हाड (आळंदी) तर ७ फेब्रुवारीला ह. भ. प. सुरेश महाराज वारके (जळगावकर) यांची कीर्तनसेवा होणार आहे. ८ फेब्रुवारीला प्रकट दिनानिमित्त सकाळी ह. भ. प. नारायण महाराज खंदारे तर सायंकाळी ह. भ. प. यशवंत महाराज चौखंडे यांचे कीर्तन होणार आहे. महोत्सवाची सांगता ९ फेब्रुवारीला ह. भ. प. गजानन महाराज लाहुडकर (आळंदी) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

# राजर्षी शाहू कॉलेजमध्ये 'इनोव्हिजन' तांत्रिक महोत्सवाचे आयोजन

**पिंपरी (दै. संध्या) :**

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने दि २ व ३ फेब्रु २०२६ रोजी दोन दिवस "इनोव्हिजन २०२६" या भव्य टेक्नो-सोशल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २ रोजी स १० वा . उद्घाटन होईल.या प्रसंगी उच्च शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, (IISER) चे अध्यक्ष डॉ अरविंद नातू, माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर, एनआयपीएम पिंपरी चिंचवड चॅप्टरचे अध्यक्ष प्रदीप मानेकर, कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे मान्यवर




उपस्थित राहणार आहेत.

इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जात असून, इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे.इनोव्हिजन २०२६ची यावर्षीची संकल्पना "समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान" अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते. या संकल्पनेद्वारे विद्यार्थ्यांना पारंपरिक अभियांत्रिकी उपायांच्या पलीकडे विचार करून समाजाभिमुख व शाश्वत तंत्रज्ञान विकासाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित केले जाणार आहे.

आयोजन समितीचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मते, डॉ. अजय पैठणे आणि डॉ. प्रवीण घटे यांनी सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. इनोव्हिजन २०२६ मुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त क्षमतांना वाव देण्याची, संघभावना विकसित करण्याची संधी मिळणार आहे, तसेच स्पर्धात्मक आणि सहकार्यात्मक उपक्रमांद्वारे प्रत्यक्ष समस्यांचे समाधान शोधण्याचा अनुभव मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

इनोव्हिजन २०२६ चे संयोजक डॉ. अविनाश बडधे यांनी सांगितले की हा महोत्सव राष्ट्रीय पातळीवरील टेक्नो-फेस्ट म्हणून आकार घेत असून देशभरातील विविध महाविद्यालयांकडून मोठ्या प्रमाणात नोंदणी सुरू झाली आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनाही समान संधी मिळावी यासाठी प्रवेश सर्वांसाठी खुला ठेवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विविध कल्पना, स्पर्धात्मक वातावरण आणि देशभरातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्याची संधी इनोव्हिजन २०२६ विद्यार्थ्यांना देणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

"इनोव्हिजन २०२६ हा नवकल्पना, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव ठरत असून, तंत्रज्ञान व मूल्यांच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान देण्यासाठी तरुण पिढीला सक्षम करण्याचा हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे," असे मत संस्थेचे संचालक-सचिव प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी व्यक्त केले.

या महोत्सवाअंतर्गत विविध तांत्रिक स्पर्धा, नवोपक्रम आव्हाने, सामाजिक प्रभावावर आधारित उपक्रम तसेच विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. कार्यक्रमाची सविस्तर माहिती, नोंदणी व वेळापत्रकासाठी विद्यार्थ्यांनी www.rscoeinnovision.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ओला, सुका, घातक व सॅनिटरी कचरा वेगळा देण्याचे महापालिकेचे आवाहन

**पिंपरी (दै. संध्या) :**

■ चार प्रकारे कचरा विलगीकरणावर आरोग्य विभागाचा भर

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने व्यापक जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने नागरिकांनी घरगुती कचरा चार प्रकारांत विलगीकरण करूनच कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटागाडीला द्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली शहरातील सर्व प्रभागांमध्ये ही जनजागृती मोहीम वेगाने राबवली जात आहे. या मोहिमेत घराघरांत संपर्क, फलक, पत्रके, समाजमाध्यमांद्वारे संदेश, तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. नागरिकांना कचरा विलगीकरणाचे महत्त्व समजावून सांगितले जात आहे. योग्य पद्धतीने विलगीकरण केल्यास कचऱ्यावर वैज्ञानिक प्रक्रिया करणे सुलभ होते, पुनर्वापराचे प्रमाण वाढते, लँडफिलवरील ताण कमी होतो आणि पर्यावरण संवर्धनास चालना मिळते. तसेच शहरातील दुर्गंधी, कचऱ्याचे ढीग व प्रदूषण यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी घरातील कचरा चार प्रकारांत वेगळा करून तो वेळेत महापालिकेच्या घंटागाडीला द्यावा. कचरा इतरत्र न टाकता नियमानुसार संकलन वाहनालाच देऊन आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असेही आवाहन प्रशासनाने केले आहे.

**कचऱ्याचे असे करा विलगीकरण**

- ओला कचरा – उरलेले अन्नपदार्थ, भाजीपाल्याचे तुकडे, फळांच्या साली इत्यादी; यासाठी हिरव्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- सुका कचरा – कागद, प्लास्टिक, काच, धातूच्या वस्तू, यासाठी निळ्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- घरगुती घातक कचरा – बॅटऱ्या, ट्यूबलाईट/ बल्ब, औषधांचे अवशेष, रसायनयुक्त वस्तू; यासाठी काळ्या रंगाच्या डब्याचा वापर करावा.
- सॅनिटरी कचरा – सॅनिटरी पॅड, डायपर, वैद्यकीय वापरातील साहित्य; यासाठी लाल रंगाच्या डब्याचा वापर करावा.

शहर स्वच्छतेसाठी कचरा विलगीकरण ही अत्यंत मूलभूत गरज आहे. नागरिकांनी ओला-सुका कचरा एकत्र न देता चार विविध प्रकारांत विलगीकरण करून तो महापालिकेच्या घंटागाडीला देत प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य करावे.

**- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**



## महात्मा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड,सहाय्यक आयुक्त परशुराम वाघमोडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह कर्मचारी महासंघाचे विशाल भुजबळ तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## हुतात्मा दिनानिमित्त दोन मिनिटे स्तब्धता पाळून वाहिली आदरांजली

**पिंपरी (दै. संध्या) :**

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी सकाळी ठीक ११ वाजता पिंपरी चिंचवड महानगरपालिका दोन मिनिटांसाठी स्तब्ध झाली. शब्द थांबले,हालचाली थांबल्या, भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या वीरांच्या पवित्र स्मृती जागवणारा 'हुतात्मा दिन' महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पाळण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी अंकुश कदम, कर्मचारी महासंघ प्रतिनिधी विशाल भुजबळ,नागेश जाधव तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी ३० जानेवारी रोजी संपुर्ण देशभर दोन मिनीटे मौन पाळून आदरांजली वाहण्यात येते,त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने देखील आज हुतात्मा दिनानिमित्त सकाळी ठिक ११ पासून दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. मौन (स्तब्धता) सुरू होण्यापूर्वी बेल वाजविण्यात आली. त्यानंतर महापालिकेच्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, आस्थापना तसेच उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त केला.

## प्रभागातील पाणी समस्येवर लवकरच निघणार तोडगा

### पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांच्याकडून सूचना

**पिंपरी (दै. संध्या) :**

रहाटणी, तापकीर नगर प्रभागामध्ये मागील सहा महिन्यांपासून नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. अनियमित पाणीपुरवठा, कमी दाबाने येणारे पाणी आणि काही भागात पूर्णपणे खंडित झालेला पुरवठा यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झाली होती. स्थानिक रहिवाशांकडून वारंवार तक्रारी येत असूनही प्रश्न सुटत नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांनी पुढाकार घेत पाणीपुरवठा विभागाशी सातत्याने पाठपुरावा केला. अनेक वेळा मागणी करूनही समाधानकारक तोडगा न निघाल्याने



अखेर त्यांनी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश बरीदे, उपअभियंता हृषीकेश गेंगजे, कनिष्ठ अभियंता समीक्षा मालपुरे तसेच विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत रहाटणी प्रभागातील विविध भागांतील पाणी समस्येचा सविस्तर आढावा घेण्यात आला आणि तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या बैठकीनंतर प्रशासनाने हालचाली वेगवान करत आवश्यक दुरुस्ती, वाल्व तपासणी आणि पाईपलाईन व्यवस्थापनाची कामे हाती घेतली. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून शिवराज नगर, तसेच इतर परिसरांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत सुरू झाला आहे. याशिवाय शास्त्रीनगर, नखाते वस्ती, बळीराज कॉलनी, सिंहगड कॉलनी, राजगड कॉलनी, सज्जनगड कॉलनी आणि गावठाण परिसरातही पाणीपुरवठा नियमित करण्यासाठी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

"नागरिकांना पाणी मिळालेच पाहिजे" हा ठाम आग्रह नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांनी बैठकीदरम्यान धरला. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर नागरिकांना दिलासा मिळाला असून रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून हा प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याने रहाटणी, तापकीर नगर प्रभागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांची तयारी पूर्ण

## चार प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कला मॉडेल्सचे ३१ जानेवारीला प्रदर्शन

**पिंपरी (दै. संध्या) :**

मुंबई येथे दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या देशातील प्रतिष्ठित काळा घोडा कला महोत्सवासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार प्राथमिक शाळांची निवड झाली आहे. या शाळांतील विद्यार्थ्यांची महोत्सवात सादर होणाऱ्या कला मॉडेल्ससाठी तयारी पूर्ण झाली आहे. हा कला महोत्सव ३१ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक काळा घोडा परिसरात आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवामध्ये ३१ जानेवारी रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विद्यार्थ्यांनी साकारलेली कला मॉडेल्स प्रदर्शनासाठी ठेवली जाणार आहेत.






पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशासनाधिकारी संगीता बांगर, कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले, मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर, सरस्वती भेगडे, वंदना इन्नानी, मृगनयना चव्हाण, कला शिक्षक अपर्णा मोरे, मुक्ता पाउसळकर, नेताजी घोलप, विकास आगवणे यांच्या अधिपत्याखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

महापालिकेच्या शाळांमधील ११ ते १२ वयोगटातील विद्यार्थ्यांनी आपल्या कला शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत कल्पकतेने आणि मेहनतीने ही मॉडेल्स तयार केली आहेत. या मॉडेल्ससाठी निवडलेले विषय हे केवळ कलात्मक नसून मानवी जीवन, विचारप्रक्रिया आणि आधुनिक शहरी संकल्पनांवर आधारित आहेत. यामध्ये 'अंतर्गत वळण', 'मानवी विचारांचे रोलरकोस्टर', 'रूपांतरण : जीवनाचे रोलरकोस्टर' तसेच 'स्कायवॉक : मर्यादांच्या पलीकडचे शहर' या विषयांचा समावेश आहे. या संकल्पनांमधून विद्यार्थ्यांनी मानवी मनातील चढउतार, जीवनातील बदल आणि शहराच्या विकासाच्या कल्पना प्रभावीपणे मांडल्या आहेत.

१९९९ पासून सुरू असलेला काळा घोडा कला महोत्सव हा देशातील एक महत्त्वाचा स्ट्रीट आर्ट फेस्टिव्हल म्हणून ओळखला जातो. कला, संस्कृती, संगीत, नृत्य, साहित्य आणि खाद्यसंस्कृतीचा संगम असलेला हा महोत्सव दरवर्षी हजारो कलारसिकांना आकर्षित करतो. अशा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कला मंचावर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली आहे.

महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी कला शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेली मॉडेल्स ही त्यांच्या सर्जनशील विचारांची, कष्टाची आणि समजुतीची साक्ष देतात. मानवी जीवन, विचारप्रक्रिया आणि आधुनिक शहर संकल्पनांवर आधारित विषयांवर विद्यार्थ्यांनी केलेली मांडणी अत्यंत प्रभावी आहे. या प्रकारच्या कला उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संवेदनशीलता आणि आत्मविश्वास वाढतो.

**– ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

**निवड झालेल्या शाळा**

- साई जीवन प्राथमिक कन्या शाळा, जाधववाडी
- श्री बापदेव महाराज प्राथमिक शाळा, किवळे
- यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा क्र. ६०/१, थेरगाव
- श्री वैष्णो माता प्राथमिक विद्यामंदिर, इंद्रायणी नगर, पुणे

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची काळा घोडा कला महोत्सवासारख्या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील कला मंचासाठी निवड होणे अभिमानाची बाब आहे. शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व कल्पनाशक्ती विकसित व्हाव्यात, या उद्देशाने शाळांमध्ये कला शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जात आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ कलात्मक कौशल्येच नव्हे, तर विचार मांडण्याची क्षमता, आत्मविश्वास आणि संघभावना आत्मसात केली आहे. अशा संधी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरतात.

**– विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वाल्हेत स्वर्गीय अजित पवारांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

वाल्हे (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना वाल्हे (ता. पुरंदर) येथील ग्रामस्थांसह सर्वपक्षीय कार्यकर्त्यांकडून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी ग्रामस्थांच्या पुढाकारातून येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांसह वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार भाजप ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सचिन लंबाते शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे सागर भुजबळ शरदचंद्र पवार पक्षाचे संभाजी पवार उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे हरीश दुबळे काँग्रेसचे किरण कुमठेकर राष्ट्र सेवा दलाचे राजेंद्र गायकवाड माजी सभापती गिरीश पवार अँड.फत्तेसिंग पवार सरला तिवारी सामाजिक कार्यकर्ते अमोल भुजबळ दीपक कुमठेकर तसेच दत्तात्रेय पवार सत्यवान सूर्यवंशी अनिल भुजबळ धनगर समाजाचे नेते दादासाहेब मदने सूर्यकांत भुजबळ आदी मान्यवरांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.तर अनेकांनी आपल्या मनोगतातून दादांच्या प्रेरणादायी विचारांचा जागर केल्याने वातावरण अक्षरशः भावुक झाले होते.

### चाकणला हवामान बदलाचा हापूसवर परिणाम; शेतकरी दुहेरी संकटात



चाकण (दैनिक संध्या) : कधी ऊन तर कधी थंडी, ढगाळ हवामान, वाढलेली आर्द्रता आणि अवकाळी पावसाची दाट शक्यता असल्यामुळे चाकण पंचक्रोशीतील आंबा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. चाकण परिसरातील रासे, भोसे, शेलपिंपळगाव, वडगाव घेनंद, खराबवाडी, नाणेकरवाडी, मोई, निघोजे, खालुम्ब्रे, शिंदे, वासुली, बिरदवडी, चिंचोशी, चिंबळी, मोहितेवाडी, राक्षेवाडी, वराळे, सावरदरी, सांगुर्डी, कानेवाडी, येलवाडी, महाळुंगे इंगळे, बहुळ, कोयाळी, पाईट, मरकळ, चास, कुरकुंडी, शिरोली, खरपुडी, वाकी आदी भागातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हापूस आंब्याची लागवड केली आहे. चाकण येथील धाडगे मळ्यातील आंबा उत्पादक शेतकरी शिवाजी धाडगे व काजल धाडगे यांच्या बागेतील आंब्याच्या झाडाला सुबक मोहर आलेला आहे. सततचे ढगाळ वातावरण, वाढलेली आर्द्रता यामुळे करपा, भूरी तसेच विविध बुरशी जन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. आंब्याच्या हापूस, राजापुरी, केसर, पायरी या प्रमुख प्रजातींचे उत्पादन चाकण परिसरात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. चाकण मधील बहुतांशी शेतकऱ्यांचे अर्थकारण हे आंबा उत्पादनावर अवलंबून आहे. ढगाळ हवामानामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी सध्या सर्वत्र आंब्याच्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात औषधे फवारणीची कामे सुरू आहेत. उत्पादकांच्या भांडवली खर्चात चांगलीच वाढ झाली आहे. ढगाळ हवामानामुळे अवकाळी पाऊस कोसळल्यास मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागण्याची भीती शिवाजी धाडगे यांनी व्यक्त केली आहे.

**"चाकण शहर व परिसरात बहुतांशी ठिकाणी आंब्याची झाडे मोहराने बहरली आहेत. ढगाळ हवामानाचा परिणाम होऊन बुरशीजन्य रोग वाढल्यास कणीचे फळात रूपांतर होण्याच्या प्रक्रियेवर थेट परिणाम होऊन रोगांचा धोका वाढला आहे. यामुळे मोठे नुकसान होऊ शकते."**
**- काजल धाडगे, चाकण.**



### महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त आळंदीत अभिवादन

आळंदी (दैनिक संध्या) : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आळंदी येथील इंद्रायणी नदी काठावरील महात्मा गांधी रक्षा विसर्जन स्मारक येथे अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस व विचारांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ.मनोज राका, काँग्रेसचे आळंदी शहराध्यक्ष संदीप नाईकरे पाटील, माजी शहराध्यक्ष नंदकुमार वडगावकर, मयुर कुऱ्हाडे, अर्जुन मेदनकर, महादेव पाखरे, गौरव सदानंद, राजेंद्र नागरे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी शहराध्यक्ष नंदकुमार वडगावकर यांनी आपल्या मनोगतातून महात्मा गांधी यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत सत्य, अहिंसा, समता आणि बंधुभाव या गांधीजींच्या मूल्यांची समाजाला अधिक गरज आहे. गांधी विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून, ते आजही समाजाला योग्य दिशा देणारे आहेत, महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत समाजात सलोखा, शांतता व सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी प्रत्येकाने गांधी विचार आत्मसात करण्याचे आवाहन नंदकुमार वडगावकर यांनी केले.

### सदुपयोगातून फुलांनी बहरले माळरान

सोमाटणे (दैनिक संध्या) : पर्यटक नसताना मिळणाऱ्या वेळेचा उपयोग करत कासारसाई पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांनी धरणालगतच्या माळरान जमिनीवर शेती फुलवली आहे. पूर्वी दगडगोट्यांनी भरलेली, नापीक असलेली ही जमीन त्यांच्या कष्टामुळे अल्पावधीतच बागायती शेतीत रुपांतरित झाली आहे. कासारसाई धरण परिसरात गेल्या काही वर्षांत पर्यटकांची संख्या वाढली आहे. यामुळे पाटबंधारे कर्मचाऱ्यांवर जबाबदारीही वाढली आहे. येथे दिवसभर सतर्क राहून ते पर्यटकांच्या सुरक्षेची जबाबदारी ते पार पाडत आहेत. या धावपळीच्या कामकाजातही सकाळ-सायंकाळ वेळ काढून या कर्मचाऱ्यांनी ही बागायती शेती फुलवली आहे. सध्या लग्नसराईमुळे फुलशेतीला चांगले बाजारभाव मिळत असल्याने शाखा अभियंता अमर धायगुडे यांच्या सहकार्याने पाटबंधारे विभागाच्या मालकीच्या शेतात झेंडूच्या फुलांची लागवड करण्यात आली आहे.

# संजय सावंत यांना मा. साहेब प्रतिष्ठानचा कार्यगौरव पुरस्कार



जेजुरी (दै. संध्या)

श्री क्षेत्र जेजुरी येथील सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने मा. साहेब प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा मानाचा कार्यगौरव पुरस्कार यंदा जेजुरी येथील ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते, कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष पत्रकार संजय सावंत यांना प्रदान करण्यात आला. जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीपशेठ बारभाई व उपनगराध्यक्ष गणेशशेठ निकुडे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार अत्यंत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस दीपप्रज्वलन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. पत्रकार संजय सावंत हे गेल्या २६ वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून त्यांनी कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजोपयोगी अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी गरजू, वंचित व दुर्बल घटकांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. या कालावधीत त्यांनी राज्यभरातील २३५ सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पत्रकार, आरोग्य सेवक, ग्रामसेवक, पोलिस कर्मचारी व विविध क्षेत्रातील सेवाभावी व्यक्तींना पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरविले आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली आहे. शैक्षणिक क्षेत्रातही पत्रकार संजय सावंत यांचे योगदान मोलाचे आहे. जेजुरी येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची टाकी बांधून देण्यात आली आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्या मंदिर, कोथळे तसेच विद्या प्रशाला या शाळांमध्येही पाण्याच्या टाक्यांची उभारणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरला आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्यात जेजुरी येथील स्मशानभूमीचे सुशोभीकरण हा महत्त्वाचा उपक्रम ठरला आहे. स्मशानभूमी परिसर स्वच्छ, सुव्यवस्थित व सुसज्ज करण्यात आल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातही प्रतिष्ठानचे योगदान लक्षणीय आहे. दरवर्षी संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी अन्नदान करण्यात येते. हजारो वारकऱ्यांना या उपक्रमाचा लाभ होत असून मानवतेचा संदेश देणारे हे कार्य सर्वत्र प्रशंसनीय ठरले आहे. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिरे, मोफत तपासणी, औषध वाटप, तसेच विविध धार्मिक स्थळांना देणग्या देण्याचे कार्यही प्रतिष्ठानच्या वतीने सातत्याने केले जात आहे. पत्रकार संजय सावंत यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील प्रश्न, अन्याय, विकासकामे व लोकहिताच्या बाबी सातत्याने मांडल्या आहेत. निर्भीड, प्रामाणिक व लोकाभिमुख पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे. या सर्व सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व पत्रकारितेतील योगदानाची दखल घेऊन मा. साहेब प्रतिष्ठानचा कार्यगौरव पुरस्कार देण्यात आल्याचे मा. साहेब प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष व मार्तंड देवस्थानचे माजी प्रमुख विश्वस्त डॉ. प्रसाद खंडागळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. साहेब प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश जगताप होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन प्रतिष्ठानचे सचिव पत्रकार नितीन राऊत, ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते प्रकाश खाडे, पुरस्कार समिती सदस्य डॉ. नितीन केंजळे, पुष्कर खाडे आदींनी केले. पुरस्कार स्वीकारताना पत्रकार संजय सावंत यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "हा पुरस्कार माझ्या वैयक्तिक नव्हे तर माझ्यासोबत कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान आहे. समाजासाठी कार्य करत राहण्याची प्रेरणा या पुरस्कारामुळे अधिक बळकट झाली आहे." कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात पुरस्कार वितरणाचा सोहळा अनुभवला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले. सामाजिक कार्याची प्रेरणा देणारा हा सोहळा जेजुरी शहरात चर्चेचा विषय ठरला असून सर्व स्तरातून पत्रकार संजय सावंत यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## भंडारा डोंगर ही तुकाराम महाराजांची चिंतन भूमी

तळेगाव दाभाडे (दै. संध्या)

"जगद्गुरू तुकाराम महाराजांचे रजकण भंडारा डोंगराच्या मातीला लागले आहेत. त्यामुळे या डोंगराच्या मातीचा प्रभाव आगळावेगळा आहे. महाराजांची ही चिंतन भूमी, आध्यात्मिक भूमी आहे," असे प्रतिपादन संत नामदेव महाराज वंशज केशव महाराज नामदास यांनी केले. संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती, संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी सदेह वैकुंठ गमन सोहळा, संत नामदेव महाराज व संत जनाबाई षष्ठशतकोत्तर अमृत महोत्सवी संजीवन समाधी सोहळा, संत सावता माळी ६३० वी जयंती व तपोनिधी नारायण महाराज त्रिशतकोत्तर प्रकट वर्षानिमित्त छोटे माऊली महाराज कदम यांच्या नेतृत्वाखाली श्रीक्षेत्र भंडारा डोंगर ट्रस्टने पायथ्याला अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी व गाथा पारायण तसेच कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे. या सोहळ्यात सातव्या दिवसाची कीर्तनसेवा केशव महाराज नामदास यांनी केली. "तुकोबारायांनी भंडारा डोंगरासह भामचंद्र व घोरवडेश्वर या तीन ही डोंगरावर चिंतन करीत मोठी तपश्चर्या केली. महाराज कोणत्या डोंगरावर जाणार हे जिजाईंना सांगत नसत.

## योग्य निधीमधून पायाभूत सुविधा मार्गी लावा : विकास धाडगे

चाकण (दै. संध्या)



योग्य निधीमधून पायाभूत सुविधा मार्गी लावण्याची मागणी नगरसेवक विकास धाडगे यांनी चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्याकडे केली आहे. चाकण नगरपरिषद हद्दीतील धाडगेमळा येथील श्री स्वामी समर्थ अंगण सोसायटी येथील मंदिराशेजारी जागेत पेविंग ब्लॉक बसवणे गरजेचे आहे. सारंगी सोसायटी ते गोविंद बाग सोसायटी येथील पथदिवे बसविणे, सारंगी सोसायटी ते पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गा पर्यंत पथदिवे बसवणे अपेक्षित आहे. फोर रनर हाइट्स सोसायटी समोरील विहीर साफ करून सुशोभीकरण व बंदिस्त करणे गरजेचे असून, की जेणेकरून त्या विहिरीचे पाणी वापरण्या योग्य करता येईल. नागेश धाडगे यांचे घर ते द्वारकानाथ कानपिळे यांच्या गोठ्यापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे, दावडमळा येथील कुमार धोंडीबा गोरे यांचे घर ते कैलास महादेव गोरे यांच्या घरापर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. दावड मळ्यातील सावतामाळी मंदिरा मागील बाजूस संरक्षण भिंत बांधणे, धाडगेमळा पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्ग खालील बंद मोरीतून लहान वाहन पलीकडे पुढे जाण्यासाठी मार्ग केल्यास पादचारी व वाहन चालकांना कसरत करावी लागणार नाही. एक्जरविया सोसायटीतील बंदिस्त गटारीचे काम करणे, राणूबाईमळा सारा रेसिडेन्सी समोरील ओपन स्पेस जागा साफ करून सदर जागेवर लहान मुलांना खेळण्यासाठी नाना नानी पार्क, ओपन जिम व वाचनालय करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे राणूबाईमळा येथील जिल्हा परिषद शाळेत सीसीटीव्ही बसवणे अत्यंत गरजेचे आहे. वर नमूद केलेली सर्व कामे ही योग्य निधी मधून तात्काळ करावीत, अशी मागणी नगरसेवक विकास धाडगे यांनी केली आहे.

## चाकण पंचक्रोशीत बाल गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ

चाकण (दै. संध्या)

■ नशेत असताना घडताहेत कृत्य



वाढत्या औद्योगिकीकरणामुळे चाकणसह उद्योग नगरीत दिवसेंदिवस गेल्या काही वर्षांपासून अल्पवयीन मुलांच्या गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नशेत असताना नको ते कृत्य घडत असल्याने भीती निर्माण झाली आहे.

खून, चोऱ्या, मारहाण, कोयते, विनापरवाना पिस्तूल जवळ बाळगणे, दुचाकी लांबवणे, रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणे अशा प्रकारच्या अनेक घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा मोठा सहभाग आहे. चाकण उद्योग नगरीत पोटाची खळगी भरण्यासाठी आणि कामधंद्यासाठी देशभरातून मोठ्या प्रमाणात नागरिक स्थायिक झाले आहेत. मुलांचे आई वडील कामानिमित्त दिवसभर बाहेर असल्याने अनेक अल्पवयीन मुले आपोआपच दुर्लक्षित राहत आहेत. मोबाईल, सोशल मीडिया, व्हिडिओ, गेम्स, चुकीची संगत, यामुळे मुले गुन्हेगारीकडे वळत आहेत.

चाकण, महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गेल्या काही वर्षांत झालेल्या दहा खुनांच्या घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा मोठा सहभाग आहे. कोयत्याचा वापर करून अल्पवयीन मुलांनी दहशत निर्माण केल्याचे प्रकारही चाकण पंचक्रोशीत राजरोसपणे घडत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या निर्माण झालेल्या आहेत. त्यांचे गॉडफादरही या भागात आहेत. कायद्याने अल्पवयीन असल्यामुळे त्यांना अटक करता येत नाही. तसेच शिक्षण मर्यादित असते याची जाणीव असल्याने काही गुन्हेगारी टोळ्या, सराईत गुन्हेगार, जामीनावर सुटलेले गुन्हेगार, गुंड अल्पवयीन मुलांचा वापर करून त्यांच्याकडून अगदी खुनाचे गुन्हे करून घेत आहेत.

"गुटखा बंदी असतानाही चाकण भागात मोठ्या प्रमाणात टपरी चालक गुटखा, सुगंधी तंबाखू, गांजा विक्रीसाठी ठेवतात. अत्यंत धोकादायक पद्धतीने गॅस रिफेलिंग करतात. अनेकदा गॅस सिलेंडरचे मोठे स्फोट होऊन यापूर्वी अनेकांचे नाहक बळी गेले आहेत, हे धक्कादायक आहे. विनापरवाना गुटखा, गांजाची विक्री, गॅस रिपेरिंग, रिफेलिंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे."
**- राहुल कांडगे, उद्योजक, चाकण.**

"अल्पवयीन मुले व त्यांच्या पालकांसोबत समुपदेशन, शाळांमध्ये जनजागृती कार्यक्रम, बाल सुधारगृहांच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन देण्यावर भर दिला जात आहे. काही अल्पवयीन मुलांना समूप देशनासाठी बालन्याय मंडळाकडेही पाठवण्यात येत आहे. केवळ कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही. मुलांना योग्य दिशा, खेळ, संवाद मिळाल्यास त्यांना गुन्हेगारी पासून दूर ठेवणे शक्य आहे."
**- जितेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण.**

अल्पवयीन मुले गांजा तसेच मद्याच्या आणि नशेच्या आहारी पडत आहेत. त्यामुळे मुले नशेत असताना अनेक गुन्हे करतात. गुन्हा घडल्यानंतर पोलिसांना आम्ही नशेत होतो त्यामुळे कृत्य घडले अशी कबुली दिली जाते. काही अल्पवयीन मुलांना पोलिसांनी तसेच पालकांनी अनेक वेळा समज देऊनही बाल सुधारगृहातून आल्यानंतरही ते वारंवार तेच गुन्हे करतात. त्यामुळे गुन्ह्याचे चक्र तसेच फिरत राहते. गुन्ह्यासाठी अल्पवयीन मुलांचा वापर करून त्यांना पैसे देणे व नशेची साधने दिल्याने गुन्हे वाढू लागले आहेत.

## आदिती गावडे यांना मास्टर्स ऑफ लॉ मध्ये सुवर्णपदक


चाकण (दै. संध्या)



डी. वाय. पाटील विद्यापीठ पुणे येथे घेण्यात आलेल्या मास्टर्स ऑफ लॉ या एलएलबी नंतरच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेत खेड तालुक्यातील आदिती गावडे पाटील यांना प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. डी. वाय.पाटील विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते आदिती गावडे यांना सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे राज्य कार्यकारणी सदस्य रामशेठ गावडे, अँड. गणेश सांडभोर तसेच विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कायद्याच्या पदव्युत्तर शिक्षणात आदित्य गावडे पाटील यांनी दाखवलेली गुणवत्ता, सातत्यपूर्ण परिश्रम, नियोजनबद्ध अभ्यास आणि त्या विषयातील सखोल समज या बाबी आदिती यांच्या यशामागील महत्त्वाचे घटक ठरले आहेत. कायदा विषयातील संशोधन, योग्य प्रकरणांचा अभ्यास व व्यवहारिक ज्ञानावर गावडे यांनी भर दिला होता. प्राध्यापकांचे योग्य मार्गदर्शन, विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेले शैक्षणिक वातावरण, कुटुंबाचा भरभक्कम पाठींबा मिळाला. भविष्यात कायदा क्षेत्रात समाज उपयोगी कार्य करणार आहे. न्याय, समानता व कायद्याचे राज्य मजबूत करण्यासाठी काम करण्याचा संकल्प आदिती यांनी व्यक्त केला आहे. आई - वडिलांचे आशीर्वाद, नातेवाईकांची प्रेरणा, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन, नियोजनबद्ध केलेल्या अभ्यासामुळे मला हे यश मिळाल्याचे आदिती गावडे यांनी सांगितले.

# महाविद्यालयाच्या प्रांगणात ७७वा गणतंत्र दिन उत्साहात साजरा

पुरंदर (दै. संध्या)



नौरोसजी वाडिया कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक आणि एनसीसी युनिट कडून ७७ वा गणतंत्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. बी. बी. बहुले यांनी केले, त्यांनी संविधानाची प्रस्तावना वाचली, ध्वजारोहण केले आणि नंतर राष्ट्रगीत झाले. एनएसएस प्रोग्राम ऑफिसर डॉ. प्रमिला दस्तुरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. एनसीसीच्या वायु, थिव आणि नेव्हल विंगच्या कॅडेट्सनी संचलनात भाग घेतला. नेव्हल विंगने फोनेटिक अल्फाबेटचे प्रदर्शन, आर्मी विंगने सेक्शन फॉर्मेशन आणि संयुक्त रुपात "कदम कदम बढ़ाये जा" गीताचे प्रदर्शन केले. कॉलेजने महिला विश्वचषक, महिला सक्षमीकरण, ऑपरेशन सिंदूर, आणि शतरंज विश्वचषक यासारख्या विविध विषयांचे प्रदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी देशभक्तीपर गीत गायन केले, ज्याने देशभक्तीचे वातावरण निर्माण केले.

त्यानंतर ग्रीन क्लबच्या डॉ. कोमल सावंत यांनी विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापन या विषयावर माहिती दिली.

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, उपप्राचार्य डॉ. समीना बोक्सवाला काळे आणि डॉ. एस. व्ही. अहिरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. टी. बोरकर, डॉ. प्रमिला दस्तुरे, डॉ. श्रीकांत सुतार, राष्ट्रीय सेवा योजना सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. तुषार राऊत आणि डॉ. अश्विनी दळवी यांच्या सहयोगाने कार्यक्रम पार पडला. मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या नौरोसजी वाडिया कॉलेजमधीलएन.सी.सी.च्या आर्मी, नेव्ही व एअर फोर्समधील छात्र सैनिकांची (एनसीसी कॅडेट) नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या पथ संचालनात निवड झाली आहे.

श्रोत्यांसमोर काही प्रात्यक्षिकांचे सादरीकरण ते त्यांनी केले आहे. सीयूओ - पुष्कर काळे एन. सी. सी. (एअर विंग)

एस. यू. ओ. सृष्टी सिंग, ( आर्मी विंग), सी यू ओ - अथर्व रणदिवे - एअर विंग, कॅडेट कॅप्टन - विक्रम माने (नेव्हल विंग), या एनसीसीच्या छात्र सैनिकांना लेफ्टनंट कमांडर प्रा. प्रमोद शिंदे (नेव्ही), कॅप्टन डॉ. विकास जाधव (आर्मी), फ्लाईंग ऑफिसर डॉ. विवेक आंटद (एअर फोर्स) यांनी मार्गदर्शन केले.संस्थेचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, डॉ. अशोक चांडक,

प्राचार्य डॉ. भरत बहुले, उप प्राचार्य डॉ. सुभाष अहिरे, डॉ. सचिन कांबळे, प्रा. के. पी. बागवान आदी मान्यवरांनी सर्व विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले यांना पुणेकरांतर्फे अभिवादन

■ गोडबोले यांचा २३ वा स्मृतीदिन; लष्करातील जवानांची मानवंदना

पुणे (दैनिक संध्या) : भारत माता के जय... शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले अमर रहे... च्या घोषणांनी थोरले बाजीराव रस्त्यावरील महाराणा प्रताप उद्यानाचा परिसर दुमदुमून गेला. देशभक्तीने भारलेल्या वातावरणात पुणेकरांसह भारतीय लष्करातील जवान व सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील मानवंदना दिली. सैनिक मित्र परिवार आणि सहयोगी संस्थांतर्फे महाराणा प्रताप उद्यानात असलेल्या स्मारकासमोर गोडबोले यांचा २३ वा स्मृतीदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले यांचे वडील चंद्रकांत गोडबोले, ६३ इंजिनिअरिंग रेजिमेंट चे सुभेदार विजयकुमार, आनंद सराफ, अशोक मेहेंदळे, शिरीष मोहिते, शाहीर हेमंतराजे मावळे, विष्णू ठाकूर आदी उपस्थित होते. उपस्थितांनी स्मारकाचे पूजन करीत शहिदांचे स्मरण केले. लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळा, फुलगाव यांनी संचलन करीत मानवंदना दिली.तसेच राष्ट्रगीत म्हणून देशभक्तीची भावना देखील उपस्थितांमध्ये पुन्हा एकदा जागृत करण्यात आली. ज्यांना या कार्यक्रमाला येता आले नाही. त्यांनी पुढील तीन दिवस स्मारकाला भेट देऊन अभिवादन करावे, असं आवाहन यावेळी करण्यात आले.

### श्रीमत् ग्रंथराज दासबोध प्रकाशनाचा भव्य सोहळा रविवारी (दि.1)



■ 'राष्ट्रगुरू श्री समर्थ रामदास स्वामी' या विषयावर चारुदत्त आफळे यांचे व्याख्यान

पुणे (दैनिक संध्या) : समर्थ रामदास स्वामी प्रतिष्ठान, संभाजीनगर संपादित श्रीमत् ग्रंथराज दासबोध पारायण ग्रंथाचा भव्य प्रकाशन सोहळा रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता सदाशिव पेठेतील गीता धर्म मंडळ, पुणे येथे होणार आहे. राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. चारुदत्त आफळे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. प्रकाशनानंतर 'राष्ट्रगुरू श्री समर्थ रामदास स्वामी' या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या ग्रंथामध्ये श्री मनोबोध (मनाचे श्लोक), श्री आत्माराम, श्री करुणाष्टके, श्री समर्थ त्रिसूत्री, सर्व आरत्या, श्री रामरक्षा, श्री हनुमान चालीसा, विद्यार्थ्यांना उपदेश, छत्रपती शिवाजी महाराजांना लिहिलेले पत्र, श्री गोंदवलेकर महाराजांचे अभंग, संतकवी दासगणू महाराज लिखित समर्थ अष्टक, तसेच प्राचार्य अ.दा. आठवले (स्वामी वरदानंद भारती) रचित संस्कृत स्तोत्र व त्याचा मराठी अनुवाद यांचा समावेश आहे. राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. चारुदत्त आफळे यांचे सांगीतिक व्याख्यान होणार असून हार्मोनियमवर वरद दातार व तबल्यावर गिरीश सातोनकर साथ करणार आहेत. श्री समर्थ रामदास स्वामी प्रतिष्ठान, संभाजीनगरचे संस्थापक अध्यक्ष, तबला वादक तालदास गिरीश वसंतराव सातोनकर यांनी केले आहे.

### अंगणवाडीताई करणार केवायसी चुकलेल्या बहिणींची पडताळणी

पुणे (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक असलेले 'केवायसी' अपडेट करताना तांत्रिक कारणास्तव किंवा अज्ञानामुळे अनेक महिलांनी चुकीचा पर्याय निवडला होता. यामुळे शेकडो पात्र महिलांचे अर्ज त्रुटींमध्ये अडकले आहेत. मात्र, आता राज्य सरकारने अशा महिलांना मोठा दिलासा दिला असून, अंगणवाडी सेविकांमार्फत या महिलांची प्रत्यक्ष घरपोच पडताळणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यामुळे केवायसी चुकलेल्या लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळणार आहे. केवायसी प्रक्रियेत 'तुमचे लग्न झाले आहे का?', 'बँक खाते आधारशी संलग्न आहे का?', 'उत्पन्नाचा दाखला उपलब्ध आहे का?' अशा प्रश्नांना उत्तर देताना अनेक महिलांनी 'नाही' या पर्यायाची चुकीची निवड केली.

# ‘युपीएससी’मध्ये नीतिशास्त्र विषय आणल्यानंतर टीका झाली

**आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. डी. पी. अग्रवाल : ‘एमआयटी-एडीटी’ विद्यापीठात ‘नागरी सेवा आणि राष्ट्रनिर्मिती’ परिषद संपन्न**

पुणे (दै. संध्या)




देशातील सर्वांत मोठ्या व तितक्याच महत्त्वाच्या केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (युपीएससी) घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये मी अध्यक्ष असताना अनेक बदल घडवावे लागले. मात्र, जेव्हा या परीक्षेमध्ये नीतिशास्त्र या विषयाचा अंतर्भाव करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यावर चौफेर टीका झाली. तथापि, तत्कालीन सरकार व मंत्रालयाने आयोगावर ठाम विश्वास व्यक्त केल्याने या बदलांची प्रभावी अंमलबजावणी झाली. कालांतराने नीतिशास्त्राचे महत्त्व सर्वांना पटले, असे मत केंद्रीय लोकसेवा आयोगाचे (युपीएससी) माजी अध्यक्ष डॉ. डी. पी. अग्रवाल यांनी व्यक्त केले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथील स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस (एसआयसीएस) तर्फे नागरी सेवांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित “नागरी सेवा आणि राष्ट्रनिर्मिती” या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत बोलत होते.

याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. किशोर राजे निंबाळकर, विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, प्रोव्होस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलपती डॉ. मोहित दुबे, स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसचे संचालक डॉ. सुजित धर्मपात्रे, स्कूल ऑफ लॉचे अधिष्ठाता डॉ. गोविंद राजपाल आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. अग्रवाल म्हणाले की, नागरी सेवा परीक्षांमध्ये नीतिशास्त्राचा अंतर्भाव करण्यापूर्वी तो विषय माहिती तंत्रज्ञान व व्यवस्थापन संस्था (आयआयटीएम), ग्वाल्हेर येथे समाविष्ट करण्यात आला होता. कोणालाही त्रास न देता गोष्टी प्रभावीपणे घडवून आणण्याचे कार्य नीतिशास्त्र करते. नीतिमूल्ये पाळल्यामुळे जगात शांतता प्रस्थापित होते. त्यामुळे देशाचा कणा असणाऱ्या भावी प्रशासकांमध्ये नीतिमूल्ये असायलाच हवीत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, सर्वच जण सनदी अधिकारी होऊ शकत नाहीत; युपीएससी व एमपीएससी व्यतिरिक्तही समाजात विधायक बदल घडवून राष्ट्रनिर्मितीत हातभार लावता येतो, असेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. मंगेश कराड म्हणाले की, भारताला विकसित करण्याची जबाबदारी केवळ सरकार किंवा अधिकाऱ्यांची नाही. प्रत्येक नागरिकाला नागरी जबाबदारीची जाणीव होणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात पूर्ण क्षमतेने, प्रामाणिकपणे व नियमांचे पालन करून काम केल्यास २०४७ पर्यंत भारत विकसित होऊन जगात महासत्ता बनेल.

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर दुपारच्या सत्रात डॉ. पल्लवी दराडे (आयआरएस), प्रदीप कुमार यादव (आयपीएस) तसेच पुण्याच्या कर आयुक्त वैशाली पतेंगे (आयआरएस) यांनी स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोव्होस्ट डॉ. गणकर यांनी केले, तर आभार डॉ. धर्मपात्रे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहा वाघटकर यांनी केले.

#### स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी ‘लक्ष्य’ची स्थापना

या कार्यक्रमाच्या निमित्ताने नागरी सेवा तसेच राज्य सेवा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ‘लक्ष्य’ या क्लबची स्थापना करण्यात आली. या क्लबच्या माध्यमातून विद्यापीठातील अभियांत्रिकी, व्यवस्थापन किंवा इतर कोणत्याही शाखेत शिक्षण घेणाऱ्या आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना एमआयटी-एसआयसीएस मधील प्राध्यापक व तज्ज्ञांकडून सातत्यपूर्ण मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे.

## माणला प्लॉट विक्रीच्या बहाण्याने ३२ लाखांची फसवणूक

पिंपरी (दै. संध्या)

जमीन विकण्याचे आमिष दाखवून एकाकडून ३२ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना १० जानेवारी २०२१ ते १६ जानेवारी २०२३ या कालावधीत माण (ता. मुळशी) येथे घडली. गुरुवारी (२९ जानेवारी) गुन्हा दाखल झाला आहे. हिंजवडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी ओंकार अशोक आष्टेकर (वय ३५, कोथरूड, पुणे) यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका महिलेच्या (हिंजवडी, ता. मुळशी) विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित महिलेने फिर्यादीस माण येथील मल्हार पार्कमधील प्लॉट नंबर १२ विकण्याचे कबूल केले होते. त्यासाठी बँक ट्रान्सफरद्वारे चार लाख ५३ हजार आणि रोख स्वरूपात २७ लाख ४७ हजार रुपये असे एकूण ३२ लाख रुपये घेतले. व्यवहाराबाबत साठेखत करून दिले, मात्र व्यवहार पूर्ण न झाल्यास खात्री म्हणून दिलेले ३७ लाख रुपयांचे धनादेश वटले नाहीत.

## माणसापेक्षा खुर्चीला जास्त महत्त्व'; संजय शिरसाट यांनी थेटच सांगितलं

छ.संभाजीनगर (दै. संध्या)



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातामध्ये मृत्यू झाला. विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अजितदादांवर अंत्यसंस्कार होऊन अवघे ४ दिवस उलटत नाही, तोच त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार असल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यावर मंत्री संजय शिरसाट यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली. “दुखवटा संपण्याआधीच शपथविधी होतोय. राजकारणात माणसापेक्षा खुर्चीला जास्त महत्त्व दिलं जात असल्याचं दिसतं,” अशी भावना त्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. अजित पवार यांच्या निधनानंतर इतक्या वेगाने घडामोडी घडतील, अशी अपेक्षा नव्हती, असं शिरसाट म्हणाले. “काही कालावधीनंतर हालचाली होतील असं वाटत होतं. मात्र इतक्या तातडीने घडामोडी, सुनेत्रा पवार यांचं मुंबईला जाणं आणि नेत्यांची वक्तव्यं येणं.हे अनपेक्षित होतं,” असं त्यांनी सांगितलं. आज सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार असल्याचं सांगत, “सर्व विषयांचा लवकरच निपटारा होईल. पण एवढ्या घाईने शपथविधी घेण्याची गरज नव्हती; आठ दिवसांनी घेतला असता. कुठली भीती त्यांना सतावत होती?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. “अलीकडच्या घडामोडींवरून असं वाटतं की माणसापेक्षा खुर्चीला जास्त महत्त्व आहे. दुखवटा संपण्याआधी शपथविधी होणं हे योग्य नव्हतं. ही सर्वसामान्यांची भावना आहे. तीच मी व्यक्त करतोय,” असं शिरसाट म्हणाले. “अजित पवार हे राष्ट्रवादीचे मुख्य नेते होते. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. सामूहिक निर्णयांचा काळ सुरू असल्याचं दिसतं. त्यामुळेच शरद पवार यांनी ‘खंड पडेल’ असं सूचक वक्तव्य केलं असावं. या घडामोडींमध्ये शरद पवारांना कितपत माहिती होती, हे सांगणं कठीण आहे,” असं त्यांनी नमूद केलं.

## फिजिक्सवाला कडून सीबीएसई इयत्ता दहावी विद्यार्थ्यांसाठी मोफत शंका निरसन आणि मॉक प्री-बोर्ड परीक्षांचा उपक्रम

मुंबई (दै. संध्या)




अग्रगण्य शिक्षण कंपनी फिजिक्सवाला (PW) ने संपूर्ण भारतातील सीबीएसई इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शंका निरसन सहाय्य आणि मॉक प्री-बोर्ड परीक्षांचा विशेष उपक्रम जाहीर केला आहे. २०२६ मध्ये बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रभावी तयारीसाठी आवश्यक मार्गदर्शन आणि तज्ज्ञांचे सहकार्य मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत, पीडब्ल्यूशी नोंदणीकृत असो वा नसो, देशभरातील कोणताही इयत्ता दहावीचा विद्यार्थी मोफत शंका निरसन सेवा घेऊ शकतो. परीक्षेच्या तयारीदरम्यान येणारा ताण कमी करणे आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, यासाठी हा उपक्रम खास डिझाइन करण्यात आला आहे. यासोबतच, फिजिक्सवाला विज्ञान आणि गणित विषयांसाठी ऑफलाइन प्री-बोर्ड (मॉक) परीक्षा देखील आयोजित करणार आहे. या परीक्षा पीडब्ल्यूची विद्यापीठे, पाठशाला आणि ट्यूशन सेंटर्स अशा प्रत्यक्ष केंद्रांवर घेतल्या जातील. यामुळे विद्यार्थ्यांना खऱ्या बोर्ड परीक्षेसारखा अनुभव मिळेल, तसेच वेळ व्यवस्थापन, उत्तर लेखन कौशल्य आणि विषयांवरील प्रभुत्व अधिक मजबूत होण्यास मदत होईल. फिजिक्सवाला विद्यापीठ–ऑफलाइनचे सीईओ अंकित गुप्ता म्हणाले, “बोर्ड परीक्षांसारख्या निर्णायक टप्प्यावर विद्यार्थ्यांना कोणत्याही अडथळ्यांशिवाय शिक्षण आणि मार्गदर्शन मिळाले पाहिजे. अनेकदा एका शंकेचे निरसन न झाल्यामुळेही विद्यार्थ्यांवर मोठा ताण येतो. त्यामुळे आमच्याशी नोंदणीकृत असो वा नसो, प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठ, पाठशाला आणि ट्यूशन सेंटर्सच्या माध्यमातून आवश्यक पाठिंबा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि त्यांच्या संपूर्ण क्षमतेसह उत्तम कामगिरी करावी, हीच आमची महत्त्वाकांक्षा आहे.” या उपक्रमांतर्गत विद्यार्थी त्यांच्या जवळच्या फिजिक्सवाला विद्यापीठ, पाठशाला किंवा ट्यूशन सेंटरला भेट देऊन बोर्ड परीक्षेपर्यंत वैध असलेला ‘डाउट बस्टर पास’ मिळवू शकतात. तसेच शंका निरसनासाठी स्लॉट बुक करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. अनुभवी शिक्षकांकडून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या विषयांतील शंकांचे सविस्तर स्पष्टीकरण, तसेच उत्तर लेखन तंत्रांबाबत मार्गदर्शन दिले जाईल.


विद्यार्थ्यांना सीबीएसई इयत्ता दहावी अभ्यासक्रमासाठी उपयुक्त रिव्हिजन कार्ड्सही प्रदान करण्यात येणार आहेत.

#### विद्यार्थी पीडब्ल्यू ॲपच्या माध्यमातून

– १ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या विज्ञान परीक्षेसाठी आणि
– ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या गणित परीक्षेसाठी
त्यांच्या जवळच्या केंद्रावर स्लॉट बुक करू शकतात.
हा उपक्रम ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत भारतातील १३२ शहरांमध्ये कार्यरत असलेल्या फिजिक्सवाला यांच्या १९२ तंत्रज्ञान-सक्षम विद्यापीठ आणि पाठशाला केंद्रांच्या नेटवर्कद्वारे राबवण्यात येत आहे.

# भविष्यात होणारा पुणे-अहिल्यानगर महामार्ग पिढीसाठी स्वप्नच राहणार?

कवठे येमाई (दै. संध्या)




रहदारीच्या दृष्टिकोनातून अत्यंत वर्दळीचा असलेला पुणे-अहिल्यानगर महामार्गाचा प्रश्न आता अत्यंत गंभीर बनत चालला असून तो आता केवळ रस्त्याचा विषय राहिलेला नाही तर तो संपूर्ण प्रदेशाच्या विकासाला अडथळा ठरत चालला आहे. निवडणूका आल्या की राजकीय पक्ष व नेते फक्त घोषणांची आतषबाजी करत आहेत पण प्रत्यक्ष काम सुरू होताना काही दिसत नाही. हा महामार्ग कधी होणार? कोण करणार? निधी कुठे आहे? जमीन अधिग्रहण झाले का? या कोणत्याच प्रश्नांची उत्तरं जनतेसमोर ठेवली जात नाहीत.यामुळे भविष्यात होणारा पुणे-अहिल्यानगर नगर महामार्ग या पिढीसाठी तरी स्वप्नच राहणार की काय ? असे आता वाटू लागले आहे.

पुणे-अहिल्यानगर महामार्गावर कोणत्याही वेळेला प्रवास केला तरी परिस्थिती एकसारखीच असते. प्रचंड वाहतूक कोंडीमुळे दररोज लाखो रुपयांचे इंधन जळते, हजारो नागरिकांचा बहुमुल्य वेळ वाया जातो,तर रुग्णवाहिकांना होणारा उशीर रुग्णांच्या जीवावर बेतत आहे. ही समस्या या भागाचे प्रतिनिधीत्व करणारे लोकप्रतिनिधी,मंत्री यांना कोणाला दिसत नाही का? निवडणुका आल्या की रस्ता होणार अशी ठोस आश्वासने दिली जातात. निवडणुका संपल्या की विषय कुठल्या-कुठे जातो कळत ही नाही. आर्थिक विकास,औद्योगिकीकरण, गुंतवणूक व रोजगार या सर्वांची गाडी या महामार्गावरच अडकलेली आहे. शिरूर तालुक्याचे माजी आमदार सूर्यकांत काका पलांडे यांनी आवाज उठवला, रस्त्यावर उतरून आंदोलनही केले.पण घोषणांव्यतिरिक्त काही बदल झालेला दिसला नाही.मग प्रश्न असा निर्माण होतो कि,नेमके अडथळे कुठे आहेत? आणि याला जबाबदार कोण?

पुणे-अहिल्यानगर महामार्ग हा पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा आणि मराठवाडा या प्रदेशांचा जीवनदायी मार्ग समजला जातो. औद्योगिक प्रगती, शेती उत्पादनांची वाहतूक, शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगारासाठी दररोज लाखो नागरिक या महामार्गावरून प्रवास करतात. मात्र, गेल्या काही वर्षांत या मार्गावरील वाहतूक कोंडी अतिशय विक्राळ रूप धारण करीत असल्याचे पाहावयास मिळते. रस्त्याच्या क्षमतेपेक्षा वाहने दुप्पट-तिप्पट वाढली पण या महामार्गाची सुधारणा मात्र तितकीशी झाली नाही.

वाहतूक कोंडीचा सर्वात धोकादायक परिणाम आकस्मिक वैद्यकीय सेवांवर होत आहे. रुग्णवाहिका सायरन वाजवत मार्ग काढण्याचा प्रयत्न करते, पण वाहने हलत नाहीत. गंभीर रुग्ण, अपघातग्रस्त, गर्भवती महिला यांच्या उपचारांना होणारा विलंब त्यांना वाचवता येण्यासारखा नसतो. या महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे कित्येकांचे जीव गेले आहेत. पण, याचे कोणाला सोयरसुतक नाही. महामार्गामुळे होणारा प्रत्येक मिनिटाचा विलंब रुग्णाच्या जीवनासाठी निर्णायक ठरू शकतो. अजून किती जणांना जीवन मुकावे लागणार हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

पुणे- अहिल्यानगर महामार्गासाठी विविध घोषणा झाल्या आहेत. फोर लेन होणार, सिक्स लेनचा प्रकल्प मंजूर, नवीन बायपास, मेट्रो सुरू होणार, रेल्वे जाणार, प्रवास सुखकर होणार? या सर्व घोषणा निवडणूक आणि राजकीय कार्यक्रमांमध्ये वारंवार ऐकू येतात. परंतु, प्रत्यक्ष काम जसेच्या तसे थांबलेले दिसते. तारीख पे तारीख सांगितली जाते. लवकरच या रस्त्याचे भूमिपूजन होणार म्हणून बातम्या पेरल्या गेल्या. नेमके भूमिपुजून कोठे केले ? कोणी केले? हे काही कोणी पाहिलेले नाही. मात्र या रस्त्यावरची गंभीर परिस्थिती दिवसेंदिवस अधिक गंभीर होताना दिसत आहे.

रस्त्यांवरील वाहनांची संख्या आणि औद्योगिक परिसराचा विस्तार या सगळ्या गोष्टींनी वाहतूक व्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण केला आहे. अशा परिस्थितीत वाहतूक पोलिस उन, पाऊस,वारा, धूळ, धूर आणि प्रदूषणात उभे राहून ट्रॅफिक नियंत्रित करण्याची जबाबदारी पार पाडत असतात. पण, त्यांनाही एक मर्यादा आहे. रस्ता छोटा आणि वाहने जास्त. पोलिस तरी काय करणार ? आणि किती दिवस सहन करणार? रस्ता मोठा अथवा पर्याय उपलब्ध झाल्याशिवाय वाहतूक कोंडीचे कायमस्वरूपी निराकरण होणे शक्यच नाही. वाहतूक पोलिसांना रोजचे आव्हान केवळ कोंडी संपवण्याचे नसते. त्यांना नागरिकांची सुरक्षितता,अपघात नियंत्रण, शिस्त आणि तातडीच्या मार्गांना प्राधान्य देणे ही सुद्धा जबाबदारी असते.

पुणे - अहिल्यानगर महामार्गावरून एक वेळेस वाहन चालवणे म्हणजे मोठी कसरत व दिव्य अग्निपरिक्षा च आहे. पण पीएमपीएमएलचे चालक या वाहतूक कोडींमधून अनेकदा बसेस चालवतात.अनेक प्रवाशांना सुखरूप पोहचवतात. वाहतूक कोंडीचा त्यांच्या मानसिकतेवर किती परिणार होत असेल ? याचा विचार कोणी केला आहे का? खरंच, पुणे-अहिल्यानगर महामार्गावरून बस चालवणाऱ्या चालकांना मानाचा मुजरा हा केलाच पाहिजे.

थोडक्यात नागरिकांचा उपरोधिक सवाल असा आहे की, आवाज उठवण्या पेक्षा हा प्रकल्प गतीने पुढे का सरकत नाही? हा महामार्ग आपण पाहणार आहोत की नाही ? कदाचित पुढील पिढीही नाही. ही निराशा फक्त रस्त्यामुळे नाही तर वारंवार केलेल्या फोल आश्वासनांमुळे आहे असेच म्हणावे लागेल.

पुणे-अहिल्यानगर महामार्ग हा या प्रदेशाच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाचा कणा आहे. हा प्रकल्प लांबल्याने संपूर्ण जनजीवनावर विपरीत परिणाम होतो आहे. त्यामुळे पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे एक ना एक दिवस उद्रेक होण्याची शक्यता ही नाकारता येत नाही.

#### या महामार्गावर तासन्तास होणारे वाहतूक कोंडीचे परिणाम

- दररोज सकाळी आणि संध्याकाळी या मार्गावर एकसारखी परिस्थिती
- वाहने रांगेत उभी, सिग्नल्स अडकलेले, चौकांमध्ये धूळ आणि हॉर्नची दहशत,प्रदूषण
- रांजणगाव MIDC असल्यामुळे औद्योगिक मालवाहतूक अनियमित खर्च वाढतो.
- शेतकऱ्याचा भाजीपाला व माल शहरात पोहचायला उशीर झाल्यामुळे भाव योग्य मिळत नाही,पर्यायाने आर्थिक फटका बसतो.
- व्यावसायिक, पुरवठा साखळी देखील विस्कळीत होते.
- विद्यार्थी / कर्मचाऱ्यांचे नुकसान होते.
- प्रवास तणावपूर्ण होत असल्यामुळे औद्योगिक गुंतवणूक मंदावते, रोजगाराच्या संधी कमी होतात.
- ३० – ४० मिनिटांचा प्रवास २ – ३ तासांपर्यंत वाढतो. - इंधनाचा मोठा अपव्यय,- आर्थिक नुकसान, मानसिक तणाव
- दररोज होणारा हा अपव्यय एकत्रित केला तर तो कोट्यवधींच्या आर्थिक नुकसानात रूपांतरित होतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### “आम्ही राजगुरुनगर "वतीने शोकसभा, सर्व पक्षीय पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित”

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : अजित दादा यांच्या अकाली निधनाने तालुका पोरका झाला, लाखो कार्यकर्त्यांचे भवितव्य अंधातरी झाले आहे. अजितदादा यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ,आमच्या पाठीशी उभे रहा, आता रडायचे नाही तर लढायचे आहे.असे भावनिक मत माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी व्यक्त केले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या दुखद अपघाती निधनाने राजगुरुनगर येथे गुरुवारी शहरातील सर्व व्यवहार बंद ठेऊन बंद पाळण्यात आला .सायंकाळी "आम्ही राजगुरुनगर" च्या वतीने सर्वपक्षीय शोक सभेचे आयोजन करण्यात आले.या शोकसभे दरम्यान आमदार बाबाजी काळे ,माजी आमदार दिलीप मोहिते ,सुरेखाताई मोहिते,राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर,जिल्हा उपाध्यक्ष बाबा राक्षे,महिला उपाध्यक्ष कांचन ढमाले,तालुका महिला अध्यक्ष संध्या जाधव ,माजी सभापती अंकुश राक्षे,शिवसेना महिला जिल्हा संघटक विजयाताई शिंदे,उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर ॲड.मुकुंद आवटे,ॲड,मनिषा टाकळकर, गिलबिले गुरुजी,वैभव घुमटकर,,विनायक घुमटकर, बाळासाहेब सांडभोर,ॲड. निलेश आंधळे,अमर टाटीया, रफिक मोमीन,किरण आहेर,मंगल चांभारे ,पूजा थिगळे,संतोष राक्षे,सय्यद इनामदार,,सागर पाटोळे,चंदन खारीवाल,संतोष भांगे,सतीश राक्षे,नितीन ताठे,ॲड,दीपक थिगळे ,आणि विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते,संस्था,संघटना अध्यक्ष उपस्थित होते. मोहिते पाटील म्हणाले, अजितदादांचे कार्य सर्वसामान्य माणसासाठी होते. सर्वसामान्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी निर्णय घेतले. त्यांच्या निर्णयांमुळे सामान्य माणूस सुखी होता. भविष्यात काय होईल माहीत नाही,परंतु त्यांच्या जाण्याने तालुका पोरका झाला. यावेळी तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर,ॲड,मुकुंद आवटे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष किरण आहेर,सागर पाटोळे,विनायक घुमटकर,अंकुश राक्षे,बाबा राक्षे,संध्या जाधव,विजयाताई शिंदे,सतीश राक्षे,नितीन ताठे,पूजा थिगळे,,ॲड दीपक थिगळे,आदी मनोगत व्यक्त करून लाडके नेते अजितदादा यांना आदरांजली वाहिली. सूत्र संचालन माऊली प्रतिष्ठानचे कैलास दुधाळे यांनी केले.




### मोडी लिपी प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा - ॲड. कुलदीप नलावडे

नारायणगाव (दैनिक संध्या) : ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, इतिहास विभाग व संशोधन केंद्र आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग पूर्वतयारी कार्यक्रमाचे उद्घाटन ॲड. कुलदीप नलावडे यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यानिमित्ताने इतिहास विभागप्रमुख डॉ. उत्तम पठारे, डॉ. लहू गायकवाड, प्रा. आकाश कांबळे, प्रा. कृतिका धनवडे, युवा शक्ती फाऊंडेशनचे अध्यक्ष पत्रकार अशफाक पटेल, यांसह मोडी प्रशिक्षण वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते. यानिमित्ताने डॉ.पठारे म्हणाले की, यादव काळात सुरू झालेली शिवकाळात, पेशवेकाळात बहरलेल्या मोडी लिपीला सातशे आठशे वर्षांचा इतिहास आहे. आपला जुनी कागदपत्र वाचनासाठी, जुना ठेवा जपण्यासाठी मोडी वाचक महत्वाचे आहेत. यावेळी उद्घाटक ॲड. कुलदीप नलावडे म्हणाले की, मोडी लिपी नामशेष होत असताना महाविद्यालयाने मोडी लिपी प्रशिक्षण वर्गासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा. यापूर्वी महाविद्यालयाने घेतलेल्या प्रशिक्षण वर्गाला विद्यार्थ्याचा विक्रमी प्रतिसाद मिळाला याचा फायदा अनेक मोडी वाचक विद्यार्थ्यांना झाल्याचे त्यांनी सांगितले. सातबारा वाचन, कुणबी कागदपत्र, शिवकालीन पत्रव्यवहार आणि इतर अनेक दस्तऐवज वाचनासाठी विद्यार्थ्यांना यांचा उपयोग होईल. तर प्राचार्य डॉ. कुलकर्णी म्हणाले की, अनेक नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले या कागदपत्र वाचनासाठी आणि प्रमाणपत्र मिळवण्यात मोडी वाचकांचे योगदान महत्त्वाचे आहे. यासाठी विद्यार्थ्यांना मोडी लिपी शिकवण्यासाठी इतिहास विभागाने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन भाषा शिकावी असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लहू गायकवाड यांनी केले. प्रस्तावना डॉ. उत्तम पठारे यांनी तर आभार प्रा. कृतिका धनवडे, यांनी मानले.



### ट्रेसेबल फाउंडेशनच्या मदतीस जुन्नर तालुका कटिबद्ध - अमित बेनके

नारायणगाव (दैनिक संध्या) : ट्रेसेबल गिव्हिंग फाउंडेशनच्या शैक्षणिक उपक्रमासाठी सर्व प्रकारच्या मदतीस जुन्नर तालुका कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन अमित बेनके यांनी केले. ट्रेसेबल गिव्हिंग फाउंडेशन करत असलेल्या कामाची समाजातील सर्व घटकांना माहिती व्हावी यासाठी वसंत व्हीला सभागृह नारायणगाव येथे आयोजित सहविचार सभेच्या निमित्ताने तालुक्यातील शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, प्राथमिक माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर आणि मुख्याध्यापक यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यानिमित्ताने संस्थेचे अध्यक्ष नरेश सुराणा यांनी दुर्गम डोंगराळ आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्य पुस्तक योजना, ई लर्निंग साहित्य, संगणक लॅब अशा विविध उपक्रमांची माहिती दिली. भविष्यकाळात एआय'चा वापर वाढणार असून त्या दृष्टीने ही संस्था नक्कीच प्रयत्न करेल अशी ही ग्वाही या निमित्ताने देण्यात आली. यावेळी देवराम मुंडे, संग्राम फुलवडे, सारंग घोलप, ॲड.कुलदीप नलावडे, डॉ.राजेंद्र रासकर, प्रकाश नेहरकर, के.एस.ढोमसे, संतोष ढोबळे, पंकज घोलप, प्रदीप गाढवे, विकास दांगट, प्रवीण ताजणे, सतीश निमसे, कैलास करपे, रविंद्र वाजगे, सचिन मुळे, अंबादास वामन, अशफाक पटेल आदींसह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमात अशोक काकडे यांनी मान्यवरांचा परिचय करून देत सर्वांना ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले. या उपक्रमाचे तांत्रिक टीम प्रमुख पूर्वेश, सहाय्यक करुणेश व नेहा मॅडम यांचाही गौरव करण्यात आला.

# सम्यक, करमवीर यांनी पटकावले विजेतेपद

### विनायक नवयुग मित्र मंडळ आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशनच्या वतीने १७ वी एकदिवसीय राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धा

पुणे (दै. संध्या)




विनायक नवयुग मित्र मंडळ आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित श्रेयसी नरहर गोडबोले स्मृती १७व्या एकदिवसीय राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धेत सम्यक कुलकर्णी आणि करमवीरसिंग यांनी अनुक्रमे १४ वर्षांखालील आणि १० वर्षांखालील गटाचे विजेतेपद पटकावले.

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कलच्या मान्यतेने ही स्पर्धा भांडारकर रोडवरील साने डेअरी चौक येथील मिलेनियम टॉवर्स येथे झाली.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात सातव्या फेरीअखेर सम्यक कुलकर्णी आणि आयुष माहुरकर यांचे समान सहा गुण झाले. टायब्रेकमध्ये सरस ठरल्याने सम्यक अव्वल, तर आयुष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. दहा वर्षांखालील मुलांच्या गटात करमवीरने सात फेऱ्यांअखेर ६.५ गुणांसह विजेतेपद निश्चित केले. विजेत्यांना मोटरस्पोर्ट्स खेळाडू संजय टकले आणि क्रिकेटपटू तेजल हसबनीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी नगरसेवक पुनीत जोशी, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे सचिव निरंजन गोडबोले, विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्टचे कार्याध्यक्ष नगरसेवक सुनील पांडे लोहगावकर, क्रीडा समिती अध्यक्ष समीर हाळंदे, वरुण जकातदार, योगेश माळी, महेश माळी, ऋषिकेश आर्य उपस्थित होते. विजेत्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

सातव्या फेरीचे निकाल

१४ वर्षांखालील गट – सम्यक कुलकर्णी (६) बरोबरी वि. अभिजय वाळवेकर (५.५), आयुष माहुरकर (६) वि. वि. कविश लिमये (५), विहान देशमुख (५.५) वि. वि. वेदांग अस्निकर (४.५), हेरंब रहाणे (४.५) पराभूत वि. विनय एस. के. (५.५), अधिराज बाबर (४) पराभूत वि. चिन्मय रेड्डी (५.५), मलय बांगूर (५) वि. वि. समृद्धी मक्तेदार (४), पुरंजय बांगूर (४) पराभूत वि. भुवनेश पवार (५), श्रीकर निबंधे (४) पराभूत वि. अक्षत अगरवाल (५), धवल कदम (५) वि. वि. रोनक साहू (४), अबिर देशपांडे (३.५) पराभूत वि. राजवर्धन लोदम (४.५).

१० वर्षांखालील गट – करमवीर सिंग (६.५) बरोबरी वि. अद्विका कुलकर्णी (५.५), वारेण्या साहू (४) पराभूत वि. अर्णव कांगो (६), अक्षद चंदनखेडे (४.५) बरोबरी वि. क्रिशय शर्मा (४.५), कार्तिकसिंग भंडारी (५) वि. वि. पीयूष शेवाळे (४), अव्यय ए. जे. (४.५) बरोबरी वि. यश कांबळे (४), रेयांश गावकर (४) पराभूत वि. अद्वैत्य विजयकुमार (३), अद्वित कुलकर्णी (३) पराभूत वि. प्रियांश चंदनखेडे (४), ईशान पाटील (३) पराभूत वि. अर्णव मुकने (४), पार्थ रोंगे (३) पराभूत वि. अनिरुद्ध नगरकर (३.५), अथर्व गदगी (२) पराभूत वि. रुआन गोरेला (३).

## ‘गटनेते’ पदी ॲड. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांची निवड

पुणे (दै. संध्या)



पुणे महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे १५ नगरसेवक निवडुण आले. आज काँग्रेस भवन येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्ये अध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेसच्या नवनियुक्त नगरसेवकांच्या बैठकीत काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक ॲड. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांची पुणे महानगरपालिका काँग्रेस पक्ष गटनेते पदी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे खजिनदार ॲड. अभय छाजेड, माजी आमदार दिप्ती चवधरी, प्रवक्ते गोपाळ तिवारी, पुणे शहर काँग्रेस उपाध्यक्ष अजित दरेकर, प्राची दुधाने व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. मागील आठवड्यात काँग्रेस पक्षाचे माजी मंत्री व पुण्याचे निरिक्षक सतेज उर्फ बंटी पाटील यांनी काँग्रेस भवन येथे सर्व नवनिर्वाचित काँग्रेस नगरसेवकांची स्वतंत्र भेट घेवून गटनेता पदासाठीचा कल घेतला होता. तेव्हाच कदम यांच्या नावास एकमताने समंती मिळाली होती.

गटनेते पदी निवड झाल्यानंतर ॲड. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांनी काँग्रेस पदाधिकाऱ्यांसमवेत विभागीय आयुक्तांकडे जाऊन तसे पत्र सादर केले.

ॲड. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम हे कोथरूडच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अग्रणी नाव आहे. चंदूशेठ यांना लोकसवेची प्रेरणा घरातून म्हणजेच माजी मंत्री आणि भारती विद्यापीठाचे संस्थापक स्व.डॉ. पतंगराव कदम साहेब आणि लोकनेते पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक स्व. सुबराव कदम साहेब यांच्याकडून मिळाली. या दोन्ही प्रेरणादायी नेत्यांच्या कामाचा वारसा पुढे घेऊन जात असताना चंदूशेठ यांनी पूर्ण समर्पणाने जनतेची सेवा केली. पुण्यातील कोथरुड भाग भाजपाचा बालेकिल्ला म्हणून सर्वश्रुत आहे. भाजपाच्या होम पीचवर चंदूशेठ गेली १५-२० वर्षांपासून नॉट आऊट बॅटिंग करत आहेत. २००७ साली चंदूशेठ यांनी पुण्यासारख्या महानगरात प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. प्रथम पाच वर्ष स्वीकृत नगरसेवक म्हणून कार्यरत असताना त्यांनी कामाच्या जोरावर मोठा जनाधार मिळवला. आपल्या अथक परिश्रमाने लोकांशी जिव्हाळ्याच्या नाते जोडले. २०१२ साली त्यांनी पहिल्यांदा पुणे महानगरपालिकेची निवडणूक लढवली. या निवडणुकीत त्यांना स्वतः तर मोठा विजय मिळवलाच शिवाय काँग्रेस पक्षाच्या सहकारी महिला उमेदवारला देखील निवडून आणले. हीच किमया त्यांनी २०१७ आणि आता २०२६ मध्ये करून दाखवली आहे. यातून त्यांच्या प्रभावी आणि सक्षम नेतृत्वाची प्रचिती मिळते. लोकप्रतिनिधीत्वाच्या या प्रवासात त्यांनी समाजकारणाच्या माध्यमातून राजकारण करत प्रभागात शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा सक्षम केल्या. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, कोरोनात स्व. खर्चाने ५००० महिलांचे लसीकरण, महिला सशक्तीकरण योजना, बांधकाम कामगार योजना, घरेलू कामगार योजना, संजय गांधी निराधार योजना, पेन्शन योजना, आधारकार्ड वाटप, मोफत ई-श्रम योजना अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी हजारो लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवले.



## व्यसनमुक्तीसाठी चळवळ उभारणार

मंचर (दै. संध्या)

“पार्टी, मिरवणूक व वरात या समारंभांमध्ये सर्रास मद्यसेवन व अन्य व्यसनाचे प्रमाण वाढत आहे. अल्पवयीन मुलेही त्यात भरडली जात आहेत. पारंपरिक व आनंदाचे प्रसंग आज बदनाम झाले आहेत, अशा समारंभांतूनच व्यसनाचे प्रमाण वाढणे ही चिंताजनक बाब आहे. व्यसनमुक्तीची चळवळ आंबेगाव तालुक्यातील प्रत्येक गावात, शाळा व महाविद्यालयात राबविण्यासाठी पुढाकार घेतला जाईल,” असे विवेकवसा फाउंडेशनचे संघटक व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते विशाल विमल यांनी सांगितले.

पिंपळगाव-खडकी (ता. आंबेगाव) येथील श्रीराम विद्यालयात ‘चला, व्यसन मुक्तीच्या चळवळीत सहभागी होऊ’ या विषयावर आयोजित कार्यक्रमात विशाल विमल बोलत होते. यावेळी मुख्याध्यापक दादासाहेब फापाळे, शालेय गुणवत्ता संवर्धन अभियानाचे परीक्षक दत्तात्रय भोर, ग्रामस्थ योगेश बारवकर, लिंबाजी पोखरकर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. विमल म्हणाले, “व्यसनजन्य पदार्थांचे पहिले सेवन झाल्यापासूनच मेंदू या पदार्थांचा गुलाम बनतो. त्यातून बाहेर पडणे अत्यंत कठीण होते. या पदार्थांचा मेंदूवर विपरीत परिणाम होऊन मानसिक संतुलन बिघडते.




## लायन्सच्यावतीने रक्तदान शिबीर

पिंपरी (दै. संध्या)

लायन्स क्लब निगडी च्या वतीने ओम साई फिटनेस क्लबच्या सहकार्याने घेण्यात आलेला रक्तदान शिबिरात ८५ जणांनी रक्तदान केले. नियोजन डॉ दिलीपसिह मोहिते यांनी केले होते. प्रांतपाल राजेश आगरवाल, उपप्रांत पाल श्रेयश दीक्षित, क्लबच्या अध्यक्षा रश्मी नायर, हर्ष नायर, मीलांजली मोहिते, अशोक येवले, आर के मंत्री, प्रदीप ढोकरे, मंजिरी कुलकर्णी, प्रशांत कुलकर्णी, संतोष बांदेकर, सीमा बांदेकर आणि ओमसाई फिटनेसचे सदस्य यांच्या सह आदी मान्यवर उपस्थित होते.

## हवेली तालुका विकासाचा आदर्श ठरवु : राहुल कुल

लोणी काळभोर (दै. संध्या)



हवेली तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्ष हाच एकमेव विश्वासार्ह पर्याय असून तालुक्याचा चेहरामोहरा बदलणारे उड्डाणपूल, रिंग रोड, मेट्रो विस्तार असे महत्त्वाकांक्षी प्रकल्प भाजप सरकारमुळेच मार्गी लागले आहेत, असे ठाम प्रतिपादन दौंडचे आमदार राहुल कुल यांनी केले. या विकासकामांना अधिक गती देण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजप उमेदवारांना मोठ्या बहुमताने निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

ते श्रीक्षेत्र थेऊर येथे थेऊर जिल्हा परिषद गटाच्या भाजप उमेदवार सौ. पुष्पलता प्रकाश सावंत, थेऊर–कुंजीरवाडी–आळंदी म्हातोबा पंचायत समिती गणाचे उमेदवार योगेश काकडे तसेच कोलवडी–मांजरी–आव्हाळवाडी पंचायत समिती गणाच्या उमेदवार सौ. पूनम अशोक गायकवाड यांच्या प्रचार शुभारंभ प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद होते.

यावेळी विविध गावांचे आजी-माजी सरपंच, उपसरपंच, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी तसेच थेऊर, कुंजीरवाडी, आळंदी म्हातोबा, कोलवडी, मांजरी व आव्हाळवाडी येथील हजारो कार्यकर्ते, मतदार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार कुल म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम व दूरदृष्टी नेतृत्वाखाली राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार विकासाचा नवा इतिहास घडवत आहे. पुणे शहर आणि हवेली तालुक्याचा कायापालट करणारे दोन उड्डाणपूल प्रकल्प मंजूर झाले असून त्यासाठी थेट निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.या उन्नत पुलांमुळे वर्षानुवर्षांची वाहतूक कोंडी कायमची सुटणार असून नागरिकांचा वेळ, इंधन व पैसा वाचणार आहे. तसेच पुणे शहराभोवतीचा रिंग रोड हा ऐतिहासिक प्रकल्प मंजूर झाला असून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देत हा प्रकल्प वेगाने राबवला जात आहे. हे सर्व प्रकल्प दोन ते अडीच वर्षांत पूर्ण करण्याचा सरकारचा ठाम संकल्प आहे.

मेट्रो प्रकल्प उरुळीकांचन नंतर पुढे यवतपर्यंत वाढविण्यासाठीही भाजप सरकार सातत्याने पाठपुरावा करत असून त्यामुळे ग्रामीण भाग थेट शहराशी जोडला जाणार आहे. नदी शुद्धीकरण, वाढते नागरीकरण आणि पायाभूत सुविधांसाठी पुरेशा पाण्याच्या उपलब्धतेसाठीही भाजप सरकारने विशेष योजना आखल्या आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भाजपचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आल्यास हे सर्व लोकाभिमुख प्रकल्प अधिक वेगाने पूर्ण होतील . आणि हवेली तालुका विकासाचा आदर्श ठरेल, असा विश्वास आमदार राहुल कुल यांनी व्यक्त केला.

# सावकारकी प्रकरणात बंदुकीचा धाक; जमीन बळकावल्याचा आरोप

### त्रासाला वैतागून व्यावसायिकाचे विष प्राशन; चौघांविरोधात गुन्हा दाखल

उरुळी कांचन (दै. संध्या)



उरुळी कांचन पोलीस स्टेशन परिसरात बेकायदेशीर सावकारी व अवाजवी व्याजवसुलीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, सततच्या मानसिक, आर्थिक आणि शारीरिक छळामुळे एका तरुण व्यावसायिकाने विष प्राशन केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस स्टेशनमध्ये चार जणांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महादेव विठ्ठल जरांडे (वय ३६, व्यवसाय – जुने चारचाकी वाहन खरेदी-विक्री, रा. उरुळी कांचन परिसर) यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, आरोपी आनंता पवार व माऊली पवार यांनी व्यवसायात गुंतवणुकीच्या नावाखाली मोठ्या रकमा दिल्या. मात्र, त्यावर दरमहा ८ ते १० टक्के इतक्या अवाजवी व्याजदराने वसुली करण्यात आली.

फिर्यादीनुसार तक्रारदाराकडून ५३ लाख ८९ हजार रुपये मुद्दल घेतल्यानंतरही आरोपींनी अवघ्या ११ महिन्यांत ६० लाख ४१ हजार रुपये व्याज वसूल केल्याचा आरोप आहे. तसेच, व्याज न दिल्यास दबाव टाकत विक्रीसाठी ठेवलेल्या १२ जुन्या चारचाकी गाड्या ओढून नेण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये आरोपींनी तक्रारदारास मारहाण करून जबरदस्तीने कुंजीरवाडी येथे नेले. तेथे बंदुकीचा धाक दाखवून, कोरेगाव मूळ येथील ३ गुंठे जमीन साठेखत व कायमस्वरूपी कुलमुखत्यारपत्राद्वारे आरोपींच्या नातेवाईकाच्या नावावर करून घेण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या व्यवहारात कोणताही धनादेश प्रत्यक्षात देण्यात आलेला नसल्याचे तक्रारीत नमूद आहे.

सततच्या छळामुळे तक्रारदाराने २६ जानेवारी २०२६ रोजी विषारी औषध प्राशन केल्याचा प्रकार घडला. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून, शुद्धीत असताना दिलेल्या जबाबावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी आनंता पवार, माऊली पवार हे रा. हडपसर, दिपाली साळुंखे रा. कुंजीरवाडी, )व विजय पांडुरंग गोते रा. उरुळी कांचन, यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता, शस्त्र अधिनियम तसेच महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम अंतर्गत विविध कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास उरुळी कांचन पोलीस करीत आहेत.

दरम्यान, या प्रकरणी तक्रारदाराने २९ डिसेंबर २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात तक्रार अर्ज केला होता. त्याच अनुषंगाने उरुळी कांचन पोलिसांकडे चौकशीसाठी अर्ज आला होता.

“वेळीच कारवाई झाली असती तर माझ्या पतीने विष प्राशन केले नसते,” अशी प्रतिक्रिया तक्रारदाराच्या पत्नीने व्यक्त केली आहे.

> उरुळी कांचन परिसरातील बेकायदेशीर सावकारकी प्रकरणाची पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. संबंधित दोषी आरोपींवर कायद्याप्रमाणे कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी बेकायदेशीर सावकारांच्या जाळ्यात अडकू नये, तसेच परिसरात सावकारकीविषयी काही प्रकार घडत असल्यास तात्काळ दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाशी किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.
>
> **– बापूराव दडस, उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड विभाग**